
शनिवार
१८ ऑक्टोबर १९८०
१ रुपया

# माणूस




पृष्ठ...५



## यापुढील अंक
## दिवाळी अंक

तपशील
पृष्ठ...२३–२४

पुणे वार्ता

# एक प्रकट चिंतन

–ना. ग. गोरे

पुण्यातल्या टिळक रोडवरचा मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचा हॉल. निमित्त होते कै. शं. वा. किर्लोस्कर याच्या जन्मदिनाचं. त्या निमित्त किर्लोस्कर कुटुंबियानी एक अनौपचारिक मेळावा आयोजित केला होता. कोणत्याही व्यक्तीची जयंती म्हटली की त्या दिवशी तिचं स्मरण करून गुणाचे गोडवे गात बसणं असाच प्रकार बहुधा चालतो, पण इतर क्षेत्राप्रमाणेच याही ठिकाणी किर्लोस्कर कुटुंबियानी स्वत चं वेगळेपण कायम ठेवलं आहे.

कै. किर्लोस्करांच्या जन्मदिवशी त्या त्या काळातील समाजापुढील ज्वलंत प्रनावर अनौपचारिक मेळाव्यात चर्चा व्हावी, विचारमंथन व्हावं अशा व्यापक दृष्टिकोणातून दरवर्षी सात ऑक्टोबरला हा कार्यक्रम होत असतो. यापूर्वी या दिवशी दलितांच्या समस्यावर परिसंवाद, उपेक्षित मुलांच्या अडचणी व उपाय यावर कार्यकर्त्यांचं चर्चासत्र असे कार्यक्रम किर्लोस्कर कुटुंबियांनी आयोजित केले आहेत. आज ज्येष्ठ समाजवादी नेते नानासाहेब गोरे याचं भाषण आयोजित केलं होतं– ' एक प्रकट चिंतन. '

खरं तर हे भाषण नव्हतंच. पन्नास-साठ श्रोत्यासमोर केलेल ते एक मनमोकळं 'लाउड थिंकिंग ' होत 'सुमारे पन्नास वर्षापूर्वी मी राजकारणात जाणून-बुजून प्रवेश केला; पण त्याबद्दल मला आजही खत वाटत नाही ! ' अस सुरुवातीलाच स्पष्ट करून नानासाहेब म्हणाले, ' याचं कारण असं की राजकारणात सुद्धा पोकळी राहू शकत नाही. चागल्या लोकानी राजकारणात जायचच नाही असं ठरवलं तर मोठीच पंचाईत होईल कारण मग फक्त दुष्ट प्रवृत्तीचेच लोक हे क्षेत्र बळकावून बसतील. शिवाय या क्षेत्राची ताकद अशी आहे की, हजारो लोकांशी याद्वारे सतत संपर्क येतो अर्थात इथे राहून जशा चागल्या गोष्टी करता येतात तशाच वाईटही गोष्टी करता येतात म्हणून चागल्या लोकांनी अधिकाधिक प्रमाणात कृतिशील राजकारणात रस घेतला पाहिजे अस मला वाटतं.

' १९३० साली गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह केला. त्यानंतरही अनेक चळवळी झाल्या. गोवा मुक्ती आदोलन झालं. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ झाली. यातली कुठलीही चळवळ फुकट गेली असं मला वाटत नाही. कारण हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळालं ही स्वातत्र्यपूर्व काळातील चळवळीची सर्वात मोठी जमेची बाजू आहे. अर्थात हे स्वातत्र्य मिळत असतानाच हिंदुस्थानाचं विभाजनही झाल जेव्हा हे विभाजन झाल तेव्हा माझाही त्याला विरोध होता; पण आता जेव्हा मी विचार करतो तेव्हा असं वाटतं की ही चागली गोप्ट झाली. कारण जर १९४७ पूर्वीचा भारत आजही असता तर आपली काहीही प्रगती झाली नसती. तेव्हा आहे हा ' शेष भारत ' साभाळणं ही सुद्धा आज फार मोठी जबाबदारी आहे

' गेल्या शंभर वर्षांचा भारताचा राजकीय -सामाजिक इतिहास समोर ठेवला तर मी या काळाचे चार भाग करेन. १८८० ते १९२० या काळाला ' जनजागरणपर्व ' म्हणता येईल या काळात प्रथम भारतामध्ये समाजात जागृती निर्माण होऊ लागली. भारतीय असतोषाचे जनक लोकमान्य टिळक, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर यासारख्या पर्वतासारख्या उत्तुग व्यक्तिमत्त्व असणाऱ्या माणसानी याबाबतीत महत्त्वाची कामगिरी बजावली. त्यानंतर १९२० ते १९४७ हा काळ–' संघटना व संघर्षपर्व ' म्हणून मानता येईल. या कालावधीत देशातील जनतेच संघटन करून व त्याच्याच सहाय्याने ब्रिटिश शासनाशी संघर्ष करून महात्माजींनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं. १९४७ ते १९६७ या वीस वर्षांच्या कालावधीत पंडित जवाहरलाल नेहरू व लालबहाद्दूर शास्त्री यानी देशामध्ये विविध उद्योगधद्याचा पाया घातला. या कालावधीला मी ' उद्योगपर्व ' म्हणेन. १९६७ नंतर मात्र गेल्या तेरा वर्षांत देशामध्ये ' विघटनपर्वा 'ला सुरुवात झाली आहे असं माझं मत आहे.

' अर्थात बहुतेक सर्व स्वतंत्र देशामध्ये अशी विघटनपर्वं अधुनमधून येतच असतात.


साप्ताहिक माणूस

वर्ष : विसावे

अंक : विसावा

१८ ऑक्टोबर १९८०

किमत : एक रुपया

सपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस,
१०२५ सदाशिव, पुणे ३० दूरध्वनी ४८३८५९

दर दहा–वीस वर्षांनंतर एखादा नवा मनू निर्माण होत असतो अशा वेळी आधीच्या कालाचा फेरविचार, नव्या क्षुधा, नव्या जाणिवा, नव्या आशा–आकांक्षा याचा विचार करणं आवश्यक ठरतं. ही नवी आव्हानं प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राला स्वीकारावीच लागतात.

'जेव्हा आपण आपल्या देशाच्या राज्यघटनेत इथे सार्वभौम लोकसत्ताक राष्ट्र निर्माण करण्याची प्रतिज्ञा केली तेव्हा फार मोठं आव्हान आपण स्वीकारलं. कारण अशा तऱ्हेचं उदाहरण जगात त्यापूर्वी कुठेही नव्हतं. तसंच आपल्या देशाचा आकार आणि वैविध्य लक्षात घेतलं तर अजूनही याबाबतीत निराश होण्याचं कारण नाही, सावध मात्र झालं पाहिजे असं मला वाटतं. आज एकूणच परिस्थिती इतकी विचित्र आणि अवघड झाली आहे की, इग्लंड–अमेरिकेचे पतप्रधानही स्तंभित झाले आहेत ! हिंदुस्थानच्या भवितव्याचा विचार करताना या जागतिक परिस्थितीचाही संदर्भ ध्यानात ठेवला पाहिजे

'मी जेव्हा असा विचार करायला लागतो तेव्हा मनाच्या आकाशात निराशेचं मळभ दाटून येतं; पण असं कधीही वाटत नाही की, आता सूर्यप्रकाश कधीच दिसणार नाही. आता फक्त पाऊसच पडत राहील आणि त्यातच आपण बुडून जाऊ असं वाटत नाही. या विचाराच्या आवर्तानं मी दचकूनही जात नाही.

'आज जीवनाच्या बहुतेक क्षेत्रात ज्याच्याकडे नेतृत्व आहे त्यांच्यावर जनतेचा विश्वास राहिलेला नाही. मूल्याना चिकटून न राहाणं म्हणजेच राजकारण असं वातावरण आज निर्माण झालं आहे. याच मुख्य कारण असं की, आमच्याकडे स्वातंत्र्याबरोबर सत्ता आली व सत्तेपाठोपाठ संपत्ती आली. त्याचप्रमाणे हातात प्रचंड सत्ता असली तरी ध्येयावर, विचारावर निष्ठा असणाऱ्या माणसाचं संघटन सध्याचे कोणतेही नेते करू शकलेले नाहीत. अशा लोकांमुळे सामाजिक व आर्थिक क्रांतीचं पाऊल मागेच पडतं. या सर्व गोष्टींचा विचार करू लागलो की, माणसं अशा तऱ्हेने जर सतत अस्थिर आणि निष्ठाशून्य होत गेली तर या देशाच चालणार तरी कसं अशी चिंता माझ्या मनात घर करते.

'आज आम्ही लोकाशी राष्ट्राचा सांगाडा उभा केला आहे; पण मनाने आम्ही अद्यापही १५ व्या १६ व्या शतकातील सरंजामशाहीमध्येच आहोत. जाती-पातीचा विचार न करता विशिष्ट तत्त्वाभोवती माणस गोळा झाली आहेत अस चित्र अजूनही दिसत नाही. लोकसत्तेला आवश्यक असणारं मानस अजून या देशात तयार व्हायच आहे. किती तरी जुन्या विचाराची भेसळ इथल्या विचारप्रवाहामध्ये झालेली आहे हे चित्र जर बदलायच असेल तर पुन्हा एकवार सबंध हिंदुस्थानभर जनजागरणाची लाट निर्माण करावी लागेल !

'इथून पुढील काळात विरोधी पक्षानी सत्तेचा विचार बाजूला ठेवून, जनजागरण, जनसंघटन केलं पाहिजे. ते केलं की सत्ता आपोआपच चालून येईल; पण देशापुढील प्रश्न सोडवण्यासाठी केवळ राजकीय स्थित्यंतर होऊन चालणार नाही तर सामाजिक स्थित्यंतरही घडवून आणली पाहिजेत!

'आज दलितसमाज जागा झाला आहे. त्याचं वाङ्मय हे गावाबाहेरचं आहे, वेशीबाहेरच आहे, पण 'वाङ्मय' आहे त्याच वाङ्मय वाचल्यावर मला आपलं पांढरपेशाचं वाङ्मय फिकं वाटायला लागतं. या दलित, शेतकरी, आदिवासींच्या नव्या जाणिवाची, नव्या आकांक्षाची दखल आपल्याला घ्यावी लागेल.

'आपला देश आज अशा उंबरठ्यावर उभा आहे की, ज्या उंबरठ्याला दोन दरवाजे आहेत. त्यातील एक दरवाजा उघडला तर आपण समृद्धीकडे जाऊ; पण दुसरा दरवाजा मात्र आपल्याला आपत्तीच्या खोल खाईत घेऊन जाईल! म्हणून हिंदुस्थानातल्या शहाण्या-सुजाण माणसानी एकत्र बसून देशहिताच्या दृष्टीने आराखडा तयार केला पाहिजे. या देशात उभ्या राहाणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाला 'लेफ्ट ऑफ द सेंटर' असच धोरण आखाव लागेल. म्हणून यापुढील काळात व्यापक देशहित लक्षात घेऊन किमान कार्यक्रमावर एकत्र येणाऱ्या प्रक्रियेला सुरुवात झाली पाहिजे !'

सुमारे तास-सव्वा तास नानासाहेब बोलले. सध्याच्या राजकीय सामाजिक परिस्थितीबाबत बोलताना कोणताही राजकारणातला माणूस उगाचच डोके भडकावून बोलत असतो. प्रत्येक लहान-सहान गोष्टीच भांडवल करायचा प्रयत्न करत असतो. नानासाहेबांच्या भाषणात याचं माणमूसही नव्हता सखोल विचारामागचा प्रामाणिकपणा तर त्यांच्या बोलण्यातून सतत जाणवत होताच; पण व्यापक देशहिताची त्याना लागलेली आस अधिक प्रकर्षानं जाणवत होती म्हणूनच कै. शं. वा. कि. च्या जन्मतिथीच्या निमित्तानं तिथं आलेला प्रत्येक माणूस डोक्यात विचाराच काही तरी नवं वारं घेऊनच बाहेर पडला. ◻

## दिवाळी अंक

नवरात्रातल्या नंदादीपामधलं तेल संपत येऊ लागत आणि त्याबरोबरच चोरपावलानी दिवाळीचं आगमन होतं. नंदादीपाच्या ज्योतीवरूनच चेतवलेल्या पणत्या घरोघरी दिसायला लागतात, दारापुढे रांगोळीचे ठिपके आणि ओळी जुळू लागतात, आकाशकंदिलाच्या प्रकाशामध्ये दिवाळीचं वेगळेपण जाणवायला लागतं.

महाराष्ट्रातल्या निरनिराळया मराठी मासिकाचे वाजत–गाजत निघणारे दिवाळी अंक हेही या सणाचे एक वैशिष्टच मानता येईल. म्हणूनच या संदर्भात दिवाळी अंकाची विक्री फार मोठ्या प्रमाणावर करणाऱ्या पुण्यातल्या सदेश एजन्सीचे श्री. श्रीकांत खरे याची मुद्दाम भेट घेतली. याच्या आगामी दिवाळी अंकाविषयी बोलताना श्री. खरे म्हणाले,

'साधारणतः दसऱ्यापासून (१९ ऑक्टोबर) दिवाळी अंक बाजारात यायला सुरुवात होते आणि त्याची विक्री व इतर देवाण–घेवाण दिवाळीनंतरही जवळजवळ महिनाभर चालू असते. यदा सुमारे दीडशे ते पावणे दोनशे अंक तयार होत आहेत. त्यापैकी बारा रुपये किंमतीचे दोन अंक आहेत. दहा रुपये किंमतीचे चौतीस अंक आहेत, नऊ रुपये किंमतीचे पंधरा अंक आहेत. आठ रुपये किंमतीचे पंचावन्न, तर सात रुपये किंमतीचे तेहेतीस दिवाळी अंक बाजारात येत आहेत. शिवाय सहा रुपये किंमत असणारे पंधरा, पाच रुपये किंमत असणारे सात, तीन रुपये व दोन रुपये किंमत असणारे प्रत्येकी दोन–दोन आणि साडेसात रुपये व चार रुपये किंमत असणारे प्रत्येकी एकेक दिवाळी अंक लवकरच स्टॉल्सवर झळकू लागतील !

यातही खास 'स्त्रियांसाठी' निघणारे

पृष्ठ २२ वर

# आंध्र प्रदेश

## नेतृत्वबदलाचे राजकारण

**वा. दा. रानडे**

बरेच दिवस लांबणीवर पडलेला नेतृत्व-बदल अखेर आंध्रप्रदेशात झाला आणि डॉ चन्ना रेड्डींच्या जागी टी अंजय्या मुख्यमंत्री झाले डॉ. चन्ना रेड्डी पंतप्रधान श्रीमती गाधींच्या पसंतीनेच मुख्यमंत्री झाले होते आणि नवे मुख्यमंत्री टी. अंजय्या याची निवडही त्यांनीच केलेली आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्याची निवड आपणच करायची, आपल्या पसतीचा आणि आपल्या कलाने चालणाराच तो हवा ही आपली कार्यपद्धती इदिरा गाधींनी चालू ठेवली आहे. राज्य-पातळीवरील नेतानिवडीत केंद्रीय नेतृत्वाचा हस्तक्षेप चालूच आहे. नेतानिवड हा वास्तविक पूर्णपणे राजविधिमंडळ पक्षाच्या कक्षेतला विषय. पक्षानेच नेत्याची निवड केल्याचे नाटक बाह्यतः केले जाते; पण आमदाराना या बाबतीत खरोखर स्वातंत्र्य असते का? नेता पंतप्रधानानी निवडलेला असतो. त्यावर शिक्कामोर्तब करणे एवढेच काम विधिमंडळ पक्षाने करावयाचे असते. सत्तारूढ पक्षाच्या आमदाराना केवळ होयबाचा दर्जा त्यामुळे प्राप्त होतो विशेष खेदाची गोष्ट म्हणजे यात काही चुकत आहे, वावगे आहे अशी खत एकाही आमदाराला वाटल्याचे दिसले नाही. राज्यपातळीवरील पक्ष यामुळे कमकुमत होतात. आपले मतभेद, पेच, अडचणी निवारण करून घेण्यासाठी दरवेळी केंद्रीय नेतृत्वाकडे पाहण्याची प्रवृत्ती त्यांच्यात बळावते स्वत पुढाकार घेऊन काही करण्याचा उत्साहच त्यांच्यात रहात नाही. कारण प्रत्येक पाऊल टाकताना इंदिरा गाधींना ते कितपत पसत पडेल की नाही याची धास्ती, शंका त्यांच्या मनात असते; पण याचा अर्थ ते इदिरा गाधी सागतील ते सारे काही निमूटपणे मान्य करतात असा नाही बाह्यतः इदिरानिष्ठेचा देखावा ते करतात; पण आतून आपले राजकीय उद्देश साधण्यासाठी त्यांच्या वेगळया हालचाली चालूच असतात, हे १९७२ च्या निवडणुकीपासूनच दिसून आले आहे. इदिरा गाधींनी पसत केलेल्या नेत्याना त्यानी सुरुवातीस एकमताने पाठिंबा दिला व पूर्ण सहकार्याचे आश्वासनही दिले; पण नतर हळूहळू त्या नेत्याविरुद्ध हालचाली सुरु केल्या. त्यांच्या राजिनाम्याची मागणी केली, त्याच्यामागे बहुमत नाही हे सिद्ध करण्यासाठी सह्याची मोहीम केली. गुजरात, बिहार व मध्यप्रदेशात आपल्याच पसतीचे नेते इंदिरा गाधींना या दडपणामुळे बदलणे भाग पडले. १९८० च्या निवडणुकीनंतरही त्यात काही फरक पडलेला नाही, हे आंध्रप्रदेशातील घटनानी दाखवून दिले.

मुख्यमंत्रिपदी अंजय्याची निवड झाल्याने तीन महिन्याचा वाद संपुष्टात आला असे वृत्तसंस्थाच्या वातम्यात म्हटले आहे पण ते खरे नाही वाद व सघर्ष त्यापेक्षाही जुना आहे. दीड वर्षापूर्वी म्हणजे एप्रिल १९७९मध्ये चन्ना रेड्डींना हटविण्यासाठी बंडखोर गटाने जोर केला होता पण केंद्रीय नेतृत्वाने त्या वेळी त्याना सबुरीचा सल्ला दिला एक वर्षानतर त्यानी पुन. उचल केली आणि आपल्यामागे बहुमत असल्याचा दावा केला. त्याच्यामागे खरोखरच बहुमत असल्याबद्दल केंद्रीय नेतृत्वाची खात्री झाली असली तरी त्यांना एवढ्यात बदल नको होता. कारण आंध्र प्रदेशात एकदा नेतृत्व-बदलाला परवानगी दिली की इतर राज्यातही त्याच्या प्रतिक्रिया होतील आणि मुख्यमंत्रि बदलण्याच्या मागण्या तेथेही जोर धरतील व त्यातून अस्थिरता निर्माण होईल अशी भीती केंद्रीय नेतृत्वास वाटत होती. निवडणुकीनतर एवढ्या थोड्या काळात त्याना अस्थिरता नको होती.

दुसरी अडचण होती रेड्डींच्या जागी नेता कोणाला निवडायचे? बडखोर गटात त्याबाबत एकमत होत नव्हते चन्ना रेड्डी नकोत एवढ्यापुरतीच त्यांच्यात एकवाक्यता होती. आमदारामध्ये सर्व थराचा पाठिंबा मिळवू शकेल असा नेता कॉंग्रेसश्रेष्ठींना कोणी दिसत नव्हता. म्हणून केंद्रीय मंत्र्याकडे कोणाला तरी तिकडे पाठवावे असा इंदिरा गाधींचा विचार होता पी. व्ही. नरसिंह राव, टी. अंजय्या आणि व्यंकटसुब्बय्या ही तीन नावे त्याच्यापुढे होती; पण बडखोर गटाला त्यांच्यातलाच मुख्यमंत्री हवा होता. केंद्रातील मंत्री आंध्रप्रदेशात पाठविणे त्यांना पसंत नव्हते. तुम्ही एकमताने नेता निवडा, आम्ही ते मान्य करतो असे केंद्रीय नेतृत्वाने त्याना सुचविले नवा मुख्यमंत्री रेड्डी गटाच्याही पसतीचा असावा अशी अपेक्षा केंद्रीय नेतृत्वाने व्यक्त केल्याने प्रश्न अधिक बिकट झाला होता. एकदा तर एकमत झाल्यासारखे वाटले हैदराबादला पोचल्यावर सरळ राजभवनावर जाऊन राजिनामा द्यावयाचा असे ठरवून चन्ना रेड्डी दिल्लीहून विमानाने निघाले, पण विमानतळावरच त्याना निरोप मिळाला, ' राजिनामा सध्या देऊ नका असा दिल्लीहून इदिरा गाधींचा फोन आला आहे. ' नव्या मुख्यमंत्र्याचे निवडीबद्दल मतभेद झाले होते

इकडे बंडखोरगटास चन्ना रेड्डींना हटविण्याची फार घाई झाली होती. त्यानी आपली तीव्रता दर्शविण्यासाठी एक मार्ग अवलंबिला. मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार घालून बडखोर गटाने आपल्या मंत्र्याची वेगळी बैठक भरविली, केंद्रीय नेत्याकडून आदेश आल्यानंतर संध्याकाळी त्यानी आपला बहिष्कार उठविला व ते मंत्रिमंडळाच्या बैठकीस उपस्थित राहिले. नेतृत्वबदलाचा प्रश्न आता आणखी लांबणीवर टाकून चालणार नाही हे केंद्रीय नेतृत्वाने ओळखले. विधिमंडळ पक्षातील निरनिराळ्या गटानीही आपल्या मागण्यांबाबतचे आग्रह सोडले मुख्यमंत्री आमदारामधलाच हवा. तो आंध्रभागातला हवा, केंद्रातील मंत्री पाठवू नका हे आग्रह त्यानी सोडले आणि इंदिरा गाधींनीच नेता निवडावा अशी एकमताने विनती केली. त्यानी अजय्यांचे नाव सुचविले.

अंजय्या हे आंध्रप्रदेशचे सातवे मुख्यमंत्री. ब्रह्मानंद रेड्डी यांच्यानंतरचा एकही मुख्यमंत्री पुरी पाच वर्षे अधिकारावर नव्हता विधानसभेत पक्षाला प्रचड बहुमत होते; पण गटबाजीने पक्ष पोखरला होता. अजूनही गटसघर्ष सपलेले नाहीत बाह्यत एकजुटीचा देखावा केला जात असला तरी गटबाजी पुन्हा डोके वर काढील आणि नेतृत्वबदलाची मागणी पुन्हा केली जाण्याची शक्यता आहे.

आंध्रप्रदेशची प्रतिक्रिया इदिरा कॉंग्रेसची सरकारे असलेल्या इतर राज्यात एवढ्यातच उठू नये यासाठी इदिरा कॉंग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने एक दक्षता घेतली आहे. सरकारे अधिकारावर आल्यापासून एक वर्षात नेतृत्वात बदल केला जाणार नाही असे पक्षाने ठरविले असल्याचे इदिरा गाधींनी नुकतेच जाहीर केले आहे. पुढच्या जूनपर्यंत तरी नेतृत्वबदलाच्या कटकटी लांबणीवर टाकाव्यात हा त्यामागे उद्देश आहे; पण प्रश्न लांबणीवर टाकल्याने सुटत नसतात. त्याना धीटपणाने सामोरे जाऊन ते सोडवायला हवेत मुख्य प्रश्न पक्षातील गटबाजी आणि गटसघर्षाचा आहे गटबाजीचे निर्मूलन हाच त्यावर खरा परिणामकारक उपाय; पण गट सत्तेच्या राजकारणाशी निगडित आहेत आणि सत्तेच्या राजकारणालाच आपल्याकडे जोपर्यंत प्राधान्य आहे तोपर्यंत त्यांच्यातील सघर्ष चालूच राहणार! □

# थळ-वायशेत प्रकल्प....कंत्राटे कुणाला?

## देशहिताला बाधक ठरणारे निर्णय घेतले जात आहेत....सावधान!

देशहितेच्छु

महाराष्ट्रात अंतुलेसाहेबाचं शासन अधिकारावर अ.लं आणि नव्या जोडप्यानं नवा संसार थाटावा किंवा नव्या गडयाच नवं राज्य सुरू व्हाव तसा नव्या योजनांचा धडाका सुरू झाला. आल्या-आल्याच मुख्यमंत्र्यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावून ४९ कोटींचं शेतकऱ्याचं कर्ज माफ केलं. राज्यातल्या निराधार व्यक्तींसाठी दोन ऑक्टोबरच्या मुहूर्तावर 'संजय निराधार योजना' लागू केली आणि त्या पाठोपाठच साहित्य व कलेच्या क्षेत्रातील कर्तृत्व गाजवणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी 'इंदिरा ट्रस्ट' च्या स्थापनेची घोषणा केली.

थळ-वायशेतचा खत-प्रकल्प ही मुख्यमंत्र्यांच्या नाजुक बाबींपैकी एक बाब याचं मुख्य कारण तो प्रकल्प त्यांच्याच भागात– कुलाबा जिल्ह्यात– उभा राहणार आहे. शिवाय महाराष्ट्रात हा प्रकल्प उभा करायचा की नाही यावर बरच वादंग माजलं होतं. त्यामुळं तो प्रकल्प आता नीट उभा राहण आणि यशस्वीपणं चालण यालाही महत्त्व प्राप्त झालं आहे

तशी ही चर्चा जवळजवळ गेली चार वर्षं चालू होती. गेल्या वर्षी प्रकल्पाच्या उभारणीसाठी काही परदेशी कंपन्यांना कंत्राटं देण्याच्या दृष्टीन समित्याही नेमल्या गेल्या. समित्यांनी काही कंपन्यांची केंद्रशासनाकडे शिफारस केली. अमेरिकेतील सी. एफ. ब्रॉन या कंपनीला कंत्राट देण्याचा निर्णय चरणसिंगांच्या शासनान घेतलाच होता, पण आपण 'काळजीवाहू सरकार' असल्याची अपराधी भावना मनात असल्यान त्या सरकारन १९८० च्या निवडणुकीनंतर केंद्रात येणाऱ्या शासनावर अंतिम जबाबदारी सोपवली. १९८० च्या जानेवारीत इंदिराजी पुन्हा केंद्रस्थानी आरूढ झाल्या. ही सर्व चक्र पुन्हा उलटी फिरली आणि ज्या कंपन्यांना कंत्राट देण्याचं आधीच्या शासनानं नाकारलं होतं, त्यांना बोलावून ही कंत्राटं देण्यात आली अर्थात आता त्यावर विरोधी पक्षामधून जोरदार टीकेची झोड उठत आहे पूर्वीचा जवळजवळ अंतिम अवस्थेला पोचलेला व्यवहार पूर्णपणे उलटा फिरवण्यामागे फार मोठा भ्रष्टाचार दडला आहे असा विरोधी पक्षीयांचा संशय आहे. जनता पक्षाचे खासदार सुब्रमण्यम स्वामी यांनी तर केंद्र शासनाच्या या निर्णयावर आपण कोर्टातून स्थगिती आणणार असल्याचं मुंबईला एका पत्रकार-परिषदेत जाहीर केलं आहे आणि त्यामुळं लोकसभेचं दिवाळी अधिवेशन या विषयावर चांगलंच गाजणार, असा रंग दिसत आहे!

हा सर्व नेमका काय प्रकार आहे याचा मागोवा घ्यायचं ठरवल तर बरोबर चार वर्षं म्हणजे नोव्हेंबर १९७६ इतकं मागं जावं लागेल

१९७६ च्या नोव्हेंबर महिन्यात केंद्रीय पेट्रोलियम आणि रसायन मंत्रालयाने फर्टिलायझर कार्पोरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष के सी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली त्या वेळी देशाच्या पश्चिम किनाऱ्यावर जो नैसर्गिक वायू सापडला होता त्याचा सर्वांत चांगला उपयोग कसा करता येईल याविषयी सल्ला देणं हे या समितीचं मुख्य काम होतं. समितीनं आपला अहवाल केंद्राला सादर केला. त्यामध्ये समितीन असं मत व्यक्त केलं की, या पश्चिम किनाऱ्यावरच खत-प्रकल्प उभारून खताच्या निर्मितीसाठी नैसर्गिक वायूचा सर्वांत उत्तम उपयोग होऊ शकेल अर्थात याच वेळी काही तज्ज्ञांनी खतापेक्षा रसायन तयार करण्यासाठी या नैसर्गिक वायूचा उपयोग करावा असं मत व्यक्त केलं होतं; पण त्याकडे फारसं कोणीच लक्ष दिलं नाही.

समितीच्या या सल्ल्यानंतर असं ठरवण्यात आलं की दर दिवशी १३५० मेट्रिक टन खत तयार करू शकतील अशा क्षमतेचे चार प्रकल्प पश्चिम किनाऱ्यावर उभे करावेत. यापैकी दोन प्रकल्प राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड या कंपनीच्या मालकीचे असावेत व ते थळ-वायशेत इथे उभारण्यात यावेत आणि उरलेले दोन प्रकल्प इंडियन फारमर्स फर्टिलायझर को-ऑपरेटिव्ह लिमिटेड या कंपनीच्या मालकीखाली गुजरातेतील हाजिरा इथे उभारावेत असाही निर्णय केंद्र शासनाने घेतला.

आता हे सर्व जरी ठरलं तरी प्रकल्पाच्या उभारणीसाठी अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्ध असण आवश्यक होतं यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील फर्टिलायझर (प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट) इंडिया लिमिटेड या कंपनीने एखाद्या परदेशी कंपनीचं सहाय्य घेऊन हे प्रकल्प उभारण्याची तयारी दाखविली होती; पण पेट्रोलियम आणि रसायनमंत्रालयालाच हे मंजूर नव्हते म्हणून त्या वेळचे बिहारचे मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांच्या सूचनेवरून आणि त्या वेळचे या खात्याचे केंद्रीय मंत्री एच. एन. बहुगुणा यांच्या आदेशावरून फर्टिलायझर इंडिया लिमिटेडच्या 'प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट' विभागाच्या जनरल मॅनेजरची उचलबांगडी झाली व त्याला गोरखपूरला पाठवून देण्यात आलं. याच सुमारास कंपनीच्या कार्यक्षमतेवरही वृत्तपत्रांमधून टीकेची झोड उठवून कर्मचाऱ्यांचं मनोधैर्य व आत्मविश्वास खच्ची करण्याची योजनापूर्वक प्रयत्न केला गेला. त्यामुळं साहजिकच फर्टिलायझर इंडिया लिमिटेड शर्यतीतून बाहेर फेकली गेली!.

ऑक्टोबर १९७७ मध्ये त्या वेळचे नियोजन मंडळाचे सल्लागार

व सध्या ब्यूरो ऑफ इंडस्ट्रियल कॉस्ट अँड प्राइसेसचे अध्यक्ष लव्हराज कुमार याच्या अध्यक्षतेखाली नवीन समिती नेमण्यात आली. जगातील प्रगत इजिनिअरिंग कपन्याचा अभ्यास करून हे प्रकल्प उभारण्याची क्षमता असणाऱ्या परदेशी कपन्याची शिफारस ग्राह्य धरणं हे या समितीचं काम होतं त्यानुसार या समितीन पहिल्या फेरीत हम्फ्रेज् अँड ग्लासगो (इग्लड), टेक्निमॉन्ट (इटली), पूलमन केलॉग (इंग्लंड), टोयो इंजिनिअरिंग कंपनी (जपान), सी. एफ. ब्रॉन (अमेरिका) व हॅल्डॉर टॉप्सो (नॅम प्रॅगेटी-इटली) या सहा आतरराष्ट्रीय कपन्याची निवड केली.

त्यानंतर केंद्र शासनाने देशातील खतउद्योगामधील ज्येष्ठ शास्त्रज्ञ-तंत्रज्ञाची एक समिती नेमली. या समितीमध्ये राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड, इडियन फारमर्स फर्टिलायझर को-ऑपरेटिव्ह लिमिटेड, इडियन इंजिनिअरिंग कंपनी द फर्टिलायझर (प्लॅनिंग अँड डेव्हलप्मेंट) इंडिया लिमिटेड व इतर खत-उद्योगाचे प्रतिनिधि होते. वरील सहा परदेशी कपन्यापैकी कोणत्या कंपनीला कंत्राट देणे आर्थिकदृष्टया व उत्पादनाच्या क्षमतेच्याही दृष्टीने सर्वांत जास्त किफायतशीर होईल याबद्दलचा निर्णय देण्याची जबाबदारी या समितीवर सोपवण्यात आली. समितीने सहाही कंपन्याच्या आत्तापर्यंतच्या कामगिरीवर सविस्तर अभ्यास केला, चर्चा केली आणि पूलमन-केलॉग, टोयो इजिनियरिंग कंपनी व सी. एफ. ब्रॉन या तीन कंपन्याची निवड केली. त्यातही पुन्हा या तिन्ही कंपन्याच्या जगातील निरनिराळ्या भागात चालू असलेल्या प्रकल्पाना समितीने भेटी दिल्या आणि त्यानंतर थळ-वायशेत व हाजिरा या दोन्ही ठिकाणची कंत्राटं सी. एफ. ब्रॉन या कंपनीलाच देण्यात यावीत असा निर्णय एकमताने दिला. टोयो इंजिनिअरिंग आणि पूलमन-केलॅाग या कंपन्याचा अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमाक समितीने लावला. इडियन फारमर्स फर्टिलायझर को-ऑपरेटिव्ह लिमिटेडचे प्रमुख पॅाल पॅाथेन या समितीच्या अध्यक्षस्थानी होते

१९७९ च्या मार्चमध्ये या समितीने आपला निर्णय केंद्रीय पेट्रोलियम व रसायनखात्याकडे पाठवला. त्यानंतर शासनाच्या सचिव-समितीने तीन महिने चर्चा, विचार-विनिमय करून पॅाल पॅाथेन-समितीच्या शिफारशीना पाठिंवा दिला सी. एफ. ब्रॉन कंपनीला त्यानुसार कळवण्यात आलं आणि १९७९ च्या डिसेंबरमध्ये ब्रॉन कंपनीने राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेडशी अंतिम करार-मदार करण्याच्या दृष्टीने सुरुवातही केली. याच सुमारास गुजरातेतील हाजिरा येथील खत-प्रकल्पासाठीही कपनीचे इडियन फारमर्स फर्टिलायझर को-ऑपरेटिव्ह लिमिटेडशीही करार सुरू झाला होता.

जानेवारी १९८० मध्ये नवं शासन केंद्रामध्ये आल आणि पेट्रोलियम व रसायनखात्याचे केंद्रीय मत्री पी. सी. सेठी यानी आधीच्या तज्ज्ञ समितीने घेतलेल्या निर्णयाचा सपूर्ण फेरविचार करण्यासाठी नवीन समिती नेमली. फर्टिलायझर कार्पोरेशनमधील एक जुने अधिकारी बी. बी. सिंग समितीचे अध्यक्ष बनले. सार्वजनिक क्षेत्रातील खत-उद्योगामधल्या प्रतिनिधीप्रमाणेच आय सी आय. आणि इंडियन एक्सप्लोजिव्हजसारख्या मल्टी-नॅशनलमनाही समितीवर घेण्यात आल

थळ-वायशेत प्रकल्पाच कत्राट सी. एफ ब्रॅान कपनीला द्याव यावर या समितीचही एकमत झालं; पण हाजिरा येथील प्रकल्पाचही कत्राट याच कपनीला द्याव की नाही यावर मात्र समितीमध्ये मतभेद झाले. सात जणाच्या या समितीमधील तिघानी दोन्ही ठिकाणचे प्रकल्प ब्रॅान कपनीलाच द्यावेत असं मत व्यक्त केल, तर उरलेल्या चौघा जणानी मात्र दुसऱ्या कोणत्या तरी कपनीला हाजिरा-प्रकल्पाच कत्राट देण्याची शिफारस केली.

समितीचा हा अहवाल आल्यानंतर अॅडमिनिस्ट्रेटिव्ह मिनिस्ट्रीने थळ-वायशेत प्रकल्पासाठी ब्रॅान कपनीची केंद्रीय मत्रिमडळाकडे ताबडतोब शिफारस केली; पण हाजिरा-प्रकल्पाबद्दल मात्र निर्णय घेतला नाही. तेवढयात केंद्रीय शेतकी खात्याकडूनच हाजिरा-प्रकल्पासाठीही ब्रॅान कपनीलाच कत्राट द्यावं, अशी जोरदार मागणी आली. तेव्हा या सर्व बाबीचा विचार करण्यासाठी केंद्रीय मत्रिमडळाने एक उपसमिती नेमली. केंद्रीय अर्थमत्री आर. वेकटरामन, पेट्रोलियम व रसायनखात्याचे नवे मंत्री वीरेंद्र पाटील, बाधणी व गृहनिर्माण-खात्याचे केंद्रीय मत्री पी. सी सेठी व कायदामत्री शिवशकर याचा या समितीमध्ये समावेश होता; पण इथेही पुन्हा दोन तट पडले. श्री. आर वेकटरामन आणि वीरेंद्र पाटील हे ब्रॅान कंपनीलाच चारही कत्राटं द्यावीत अशा मताचे होते, तर पी. सी. सेठी आणि शिवशकर यानी ब्रॅान कंपनीला विचारातच घेऊ नये असा आग्रह धरला. तेव्हा काही तरी निश्चित निर्णय लागण्यासाठी केंद्रीय मुद्दे माहिती व नभोवाणीमत्री वसंत साठे याचा या समितीमध्ये समावेश करण्यात आला.

श्री. साठे समितीमध्ये आले आणि एकदम कळ फिरली. गेली चार वर्षं विविध शास्त्रज्ञ-तंत्रज्ञ आणि शासकीय समित्यानीही घेतलेले निर्णय पूर्णपणे उलटे फिरवण्यात आले आणि थळ-वायशेत प्रकल्पाचे कंत्राट हॅल्डॅार टॅाक्सो कंपनीला आणि हाजिरा प्रकल्पाचं कंत्राट पूलमन-केलॅाग कपनीला देण्याचा निर्णय झाला !

हा निर्णय सर्वांनाच स्तभित करणारा होता. कारण यातील हॅल्डॅार टॅाप्सो कपनीला पहिल्या फेरीतच ( १९७८ साली ) बाद करण्यात आलं होत आणि पूलमन-केलॅागचाही तिसरा क्रमाक लागला होता शिवाय ज्याचा या विषयाशी दुरूनही सबध येत नाही अशा माहिती व नभोवाणी मत्र्याचा उपसमितीमध्ये आयत्या वेळी समावेश झाला, पण ज्याच्या आखत्यारीखाली खताच वाटप होतं त्या शेतकी खात्याच्या मत्र्याला आणि अधिकाऱ्याना मात्र या सबंध प्रक्रियेत हेतुत. दूर ठेवण्यात आल !

सी. एफ्. ब्रॅान कंपनीला कत्राट देण्याची शिफारस करणाऱ्यानी पुढील मुद्दे वारवार माडले होते—

(१) या कपनीच्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे १५ ते २० टक्के ऊर्जाशक्तीची बचत झाली असती व त्यामुळे वर्षाला किमान सुमारे १५ कोटी रुपये वाचले असते.

(२) ब्रॅान कपनीच्या तत्रज्ञानामुळे नैसर्गिक वायूतील सर्वच्या सर्व अमोनियाचे युरियामध्ये रूपातर करणे शक्य झाले असते व त्यामुळे जगातील इतर कोणत्याही कपनीच्या तत्रज्ञानातून निर्माण होणाऱ्या युरियापेक्षा दोन लाख टन युरिया जास्त निर्माण करता आली असती व सध्या आयात होणाऱ्या युरियाच्या किमतीप्रमाणे वर्षाला सुमारे चाळीस कोटी रुपयाचा जास्त फायदा झाला असता.

ऊर्जाशक्ती आणि युरिया या दोन पदार्थांना येत असलेलं वाढतं मूल्य लक्षात घेतलं तर वर्षाला पचावन्न कोटी रुपयांची बचत ही सामान्य गोष्ट नव्हे, हे कोणाच्याही लक्षात येऊ शकेल.

(३) आमोनिया-तंत्रज्ञानाचे प्रवर्तक बी ए एस्. एफ् (जर्मनी) यानी सुद्धा जगातील सर्व प्रख्यात कंपन्यांचा अभ्यास करून शेवटी सी. एफ् ब्रॉन याच कंपनीला जर्मनीमधील अमोनिया-प्रकल्पाचं कंत्राट दिलं आहे.

(४) आपल्याजवळ असलेल प्रगत तंत्रज्ञान फर्टिलायझर (प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट) इंडिया लिमिटेड या कंपनीला देण्याचं ब्रॉन कंपनीनं मान्य केलं आहे. त्यामुळं जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान भारतीय शास्त्रज्ञ-तंत्रज्ञाना अवगत होऊ शकेल व अशा प्रकारच्या प्रकल्पाबाबत देश स्वावलंबी होईल.

(५) प्राथमिक फेरीमध्ये निवडण्यात आलेल्या इतर पाचही कंपन्यापेक्षा सी एफ् ब्रॉन कंपनी सर्व बाबतीमध्ये वरचढ आहेही आणि तरीही या चार प्रकल्पासाठी ब्रॉन कंपनीनं दिलेलं कोटेशन सगळ्यात स्वस्त आहे.

(६) यासंबधीचा निर्णय घेण्यास जेवढा उशीर होईल तेवढं नुकसान अधिक होणार आहे. कारण प्रकल्पाअभावी सध्या दररोज नऊ हजार टन युरियाची निर्मिती खोळंबली आहे.

लोकसभेचे खासदार हरिकेश बहाद्दूर यानी ४ सप्टेंबर, १९८० रोजी पतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी याना या संबंध प्रकरणाची फेरचौकशी करण्याचं पत्र पाठवलं तसंच इंग्लंडहून प्रसिद्ध होणाऱ्या 'केमिकल एज्' या नियतकालिकानं १२ सप्टेंबर १९८० च्या अंकात या घडामोडीची माहिती देऊन असं म्हटलं आहे की, 'सर्व-साधारण तांत्रिक किंवा आर्थिक निकषापेक्षाही काही 'अगम्य' निकष लावल्यामुळंच सी. एफ. ब्रॉन कंपनीला डच्चू मिळाला असावा.' या नियतकालिकानं पुढं असही म्हटलं आहे की, 'या अमोनिया प्रकल्पाबरोबरच दररोज १५०० टन क्षमतेचे तीन व दररोज बाराशे टन क्षमतेचे चार युरिया-प्रकल्प अनुक्रमे थळ-वाय-शेत आणि हाजिरा येथे उभारण्यात येणार आहेत या प्रकल्पाचं कंत्राट नॅम प्रॉगेटी कंपनीला (इटली) दिलेलच आहे शिवाय अशाच तऱ्हेचे चार प्रकल्प उत्तर प्रदेशात आणि मध्यप्रदेश व राजस्थान-मध्ये प्रत्येकी एक असे एकूण सहा प्रकल्प लवकरच उभारण्यात येणार आहेत. त्यामुळं थळ-वायशेत व हाजिरा प्रकल्पांचं कंत्राट जे पटकावतील त्याना भारतात पुढही भरपूर कंत्राटं मिळत राहतील. म्हणूनच ही सध्याची रस्सीखेच चालू आहे'

तेव्हा फार मोठी धडपड करून जो खत-प्रकल्प महाराष्ट्रात जवळजवळ खेचून आणला त्याचं कंत्राट कोणाला द्याव यावरून उच्च पातळीवर अतिशय स्वार्थी व भ्रष्टाचारी राजकारण खेळण्यात आलं—येत आहे. प्रकल्पाची उ.च्चतम क्षमता आणि देशहित या दोन्ही गोष्टी पूर्णपणं बाजूला ठेवून स्वत.चे खिसे भरण्याचं 'लॉकहीड प्रकरण' सध्या भारतात शिजत आहे. लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनात तर केंद्रीय शासनाला याचा जाब द्यावाच लागेल; पण त्याही आधी आमच्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अंतुलेसाहेब श्रीवर्धन इथल्या पोटनिवडणुकीत उतरत आहेत. त्याच्याच कुलाबा जिल्ह्यातल्या या प्रकल्पाबाबत विरोधी पक्षीयानी आणि सामान्य जनतेनेही अंतुलेसाहेबाना यासंबधीचा खुलासा विचारला पाहिजे. कारण हा प्रकल्प अशा तऱ्हेने वार्षिक ५५ कोटीचा जादा भुर्दंड घेऊन सुरू केला तर त्याचा बोजा अप्रत्यक्षपणे; पण निश्चितपणे भारतातल्या गरीब शेतकऱ्यावरच पडणार आहे. केंद्र शासन असो किंवा खाजगी बडा कारखानदार असो, ही रक्कम तो उत्पादनमूल्यामध्येच समाविष्ट करणार आणि त्याचा परिणाम आमच्या आता कुठे संघटितपणे उभा राहात असलेल्या शेतकऱ्याला भोगावा लागणार! तेव्हा या वर्गाबद्दल अतिशय कळवळ्याने बोलणाऱ्या आणि त्याची ४९ कोटीची कर्जमाफी करून आपल्या बोलण्याला कृतीचीही जोड देणाऱ्या आमच्या मुख्यमंत्र्यानी हे आणखी एक आव्हान का स्वीकारू नये? □

## वर्गणीदारांसाठी सूचना

वर्गणीदारांना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी २५।१०।२५ पूर्वी २ रुपये ७५ पैसे पाठवावेत.

अंक व्यवस्थित मोजून पोस्टाचे ताब्यात दिले जातात. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी. अंक शिल्लक असेल तर अवश्य पाठवू.

ज्यांची वर्गणी २५।१०।८० ला संपली असेल व ज्यांची पुढील वर्षाची वर्गणी जमा नसेल त्यांना दिवाळी अंक पाठविला जाणार नाही. जे वर्गणीदार कार्यालयातून दिवाळी अंक नेणार असतील त्यांनी २५।१०।८० पूर्वी तसे कळवावे.

**—व्यवस्थापक माणूस**

# मुंबई विद्यापीठाची संकल्पित व्यवसाय-शिक्षण योजना

**प्रा. रा म. बिवलकर**

सर चार्लस वुड याच्या अहवालावर आधारित इंग्रजी शिक्षणपद्धती १८५७ साली या देशात कार्यान्वित झाली. मागासलेल्या एतद्देशीयाना ज्ञानाच्या नव्या क्षेत्राची ओळख करून देणे प्रगत इंग्रज सत्ताधाऱ्याचे कर्तव्य आहे, या लांबरुंद बुरख्याखाली; पण प्रत्यक्षात विश्वासार्ह एतद्देशीय नोकरांचा ब्रिटिश शासनाला पुरवठा व्हावा म्हणून आणि ब्रिटिश मालाला खात्रीची बाजारपेठ मिळावी आणि ब्रिटिश उद्योगाना पुरेसा कच्च्या मालाचा पुरवठा व्हावा म्हणून या शिक्षणपद्धतीचा अवलंब केला होता यातून गोऱ्या मंडळीच्या रोजगारसंधीत कपात संभवेल, शिवाय इग्रजी शिक्षित एतद्देशीय मंडळी या देशात असंतोषाचे जनक ठरतील अशी पाल सर चार्लस वुड याच्या मनात चुकचुकत असल्याने म्हणा अगर इतर काही कारणामुळे म्हणा १८५७ साली मुबई, कलकत्ता आणि मद्रास येथे जी ३ विद्यापीठे स्थापन झाली, त्या विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातून विज्ञान, वैद्यक, वास्तुशिल्प आणि तंत्रज्ञान यांसारखे विषय डावलून भाषा, वाङ्मय तत्त्वज्ञान, इतिहास, भूगोल असले वाङ्मयशाखेतील विषय शिकविले जाऊ लागले. कलामहाविद्यालयाची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली तरी त्याची खत ना सरकारला वाटली व ना विद्यापीठाना जाचली. आमची विद्यापीठे मागणी नसलेल्या बेकार मालाचे उत्पादन करीत आहेत. त्यातून खरे तर विद्यासाधनही होत नाही आणि व्यापारउद्योगांना हव्या त्या कुशल कर्मचाऱ्याचाही पुरवठा होत नाही त्यासाठी या देशातील शिक्षणाची पुनर्रचना केली पाहिजे, स्नातकाची घसरती गुणवत्ता रोखली पाहिजे असे स्पष्ट मत १८८२ आणि १९०१ साली या देशातील उच्चशिक्षणाबाबत विचार करण्यासाठी नेमलेल्या समित्यानी दिले असतानाही आणि १९१९ साली, सर मिचेल संडलर याच्यासारख्या श्रेष्ठ शिक्षणतज्ज्ञाच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या विद्यापीठ चौकशी समितीनेही वरील परिस्थिती बाबत नापसंती व्यक्त करून शिक्षण पुनर्रचनेचा साकल्याने विचार करून संघटनात्मक, शिक्षण आणण्याबाबत, शिक्षणाच्या दिशेबाबत आणि उद्दिष्टासंबधी किती तरी चांगल्या सूचना आपल्या तेरा ग्रंथी अहवालात आग्रहाने माडल्या असूनही, उच्चशिक्षणाबाबत पहिले पाढे पचावन्न ही परिस्थिती चालूच राहिली. या समित्याचे हे अहवाल अंमलात आणायचे तर प्रयोगशाळा, उपकरणे, कार्यशाळा, संशोधनशाळा यावर सरकारला अवाढव्य खर्च करावा लागला असता. या देशाच्या औद्योगीककरण अगर व्यापारवाढीत अगर इतर क्षेत्रातील विकासात त्यांना रस नव्हता. उलट हा देश मागासला राहाण्यातच ब्रिटिश मालाला खात्रीची बाजारपेठ मिळत राहाणार होती. ब्रिटिश उद्योगाना कच्च्या मालाचा पुरवठा व ब्रिटिशजनाना अन्नधान्याचा सातत्याने पुरवठा होणार होता. यंत्रतज्ज्ञाचा मंत्र एतद्देशीयांना देऊन स्वखर्चाने पायावर धोडा पाडून घ्यायला ते सरकार तयार नव्हते. विद्यापीठे तर काय सरकारचीच 'री' ओढणार. व्यवसाय आणि धदेशिक्षणाची वेगळी सोय झाली तर त्यांचे परीक्षाशुल्काचे उत्पन्न कमी होणार होते; शिवाय आपला शिक्षणक्रम आखून देणाऱ्या अधिकारालाही धक्का बसेल अशी त्याना भीती होती शालांत परीक्षेनंतर धंदाव्यवसायाकडे वळणाऱ्याचा व ज्ञानसंपादणाऱ्याचा, असे दोन्ही ओघ आपल्या पखाखाली ओढण्यासाठी धदे आणि व्यवसाय यासाठी लागणारी कौशल्ये शिकविणाऱ्या सस्थाही विद्यापीठाच्या कक्षेतच उघडाया तर आपले उत्पन्नही वाढेल आणि या देशाच्या विकासाला आणि मानवी भाडवल वाढविण्याला हातभारही लागेल ही गोष्ट विद्यापीठाच्या गावीही नव्हती. विद्यापीठे मुख्यत वाङ्मयीन स्नातक तयार करण्याच्या आपल्या कारखान्यावर आणि निरुपयोगी संशोधन जोपासण्यावर जणू खूष होती एकंदर समाजाच्या विकासासाठी आपली काही बाधिलकी आहे असे त्याना वाटतच नव्हते.

ब्रिटिश अमदानीत एक वेळ हे सारे क्षम्य मानता येईल; पण हा देश स्वातंत्र्याच्या उंबऱ्यावर असता, सार्जंट कमिशनने, या देशातील शिक्षणाच्या पुनर्रचनेचा आणि पुनस्संघटनेचा साकल्याने विचार करून, या देशातील युद्धोत्तर शिक्षणविकासाबाबत एक योजना माडली. उद्दिष्टे, योजनाकाल, गुतवण, द्रव्यउभारणी, उत्पन्न याबाबत ४० वर्षाचा दीर्घकालीन, नियोजनआराखडा त्यात दिला होता. शिक्षणाचा आशय, गुणदानपद्धती, परीक्षापद्धती यात क्षेत्रवार बदल सुचविले होते; पण स्वातत्र्योत्तरकालात, या देशात आर्थिक योजनाद्वारे या देशाचा विकास करण्यास कटिबद्ध झालेल्या सरकारने का कोण जाणे सार्जंट योजना बाजूला सारली. शिक्षणाची पुनर्रचना आणि नव्याने सघटन करण्यासाठी पूर्वतयारी करून योजना अमलात आणण्याऐवजी सरकारने शिक्षणविस्ताराचे धोरण धरले. पारंपारिक शिक्षण देणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक शाळाची सख्या वाढविणे, कला, वाणिज्य आणि विज्ञानाचे सर्वसाधारण शिक्षण देणारी महाविद्यालये तालुक्यागणिक उघडायला संमती देणे; मागणी होईल तशी विद्यापीठाची संख्या वाढवीत नेणे या गोष्टी देशात सर्वत्र अहमहमिकेने जोपासल्या गेल्या शिक्षित बेकाराची सख्या वाढत जाणे, शिक्षणाचा दर्जा उतरत जाणे, देशभरच्या सर्व शिक्षणसंस्थात सावळागोधळ माजणे, शिक्षणक्षेत्रा-

तून शिस्तनामक चीज अस्तगत होणे, विद्यार्थ्यांच्या असंतोषातून विद्यापीठाची, महाविद्यालयाची सारी शानच नष्ट होणे ही, या धोरणाची फलश्रुती होती. येन केन प्रकारेण पदवी संपादन करणे यापरते विद्यार्थ्यांना ध्येय नव्हते शिकण्यात त्यांना रस नव्हता कारण शिक्षणाच्या आशयात भाकरी देईल असा काही भागच नव्हता

१९४४ साली विद्यापीठ अनुदानमंडळ स्थापन झाले होते ते शिक्षणसंस्थांच्या विस्तारासाठी अनुदाने देत बसले होते शिक्षणात काही सुधारणा करावी, शिक्षणाचा आशय बदलावा त्याला विकसनशील देशात हवी असलेली वेगळी दिशा द्यायला हवी, हे आपले काम आहे असे त्या मंडळाला वाटत नसावे गेल्या दहा वर्षांत पारंपारिक शिक्षणआशयाचा फोलपणा सरकारला आणि विद्यापीठ अनुदान मंडळालाही जाणवू लागला त्यातून १०+२+३ हा शिक्षणाचा नवा आकृतिबंध जन्माला आला माध्यमिक शाळापासून अभ्यासाचे विषय बदलले,त्यांचा आशय बदलला, वस्तुनिष्ठ परीक्षापद्धती आली त्यातून अनेक घोटाळे उभे राहिले त्यात मी शिरत नाही; पण नवा आकृतिबंध आणताना + २ या पायरीवर ज्यांना विद्यापीठीय ज्ञानार्जनाचा. मार्ग धरायचा असेल त्यांनी तिकडे जावे ज्यांना व्यवसायधंद्यात पडून मार्गाला लागायचे असेल त्यांनी व्यवसायधंद्याची कौशल्ये आत्मसात करण्यासाठी व्यवसायधंदेशिक्षण देणाऱ्या संस्थांकडे वळावे ही भूमिका होती उशीरा का होईना, उत्पादक शिक्षित निर्माण करण्याची आवश्यकता शिक्षणतज्ज्ञांना आणि सरकारला पटली होती, पण नवा आकृतिबंध आला आणि वाढत्या विद्यार्थीसंख्येचा लोंढा द्विवेणी करण्यासाठी आवश्यक त्या व्यवसाय-धंदे-शिक्षणाची सोय ना सरकारने केली, ना विद्यापीठांनी. आपल्या हस्तिदंत मनोऱ्यात शांतपणे बसलेल्या विद्वानांना विद्यापीठाने धंदे-व्यवसाय-शिक्षणाची सोय करायची ही कल्पनाच रुचण्यासारखी नव्हती. ' नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ' ह्या मंत्रात ही मंडळी मश्गुल होती. विद्यापीठाचीही काही सामाजिक बांधिलकी आहे याची जाण विद्यापीठ अनुदान मंडळाला आली तेव्हा आपल्या धोरणात्मक चौकटीमध्ये विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमाचा देशाच्या विकास-गरजांशी मेळ असावा आणि शिक्षणाचा कार्य, क्षेत्र, कार्यानुभव आणि उत्पादकता याच्याशी संबंध जोडला जावा, तरच शिक्षणाला विद्यार्थ्यांच्या गरजेच्या दृष्टीने आणि देशाच्या विकासाच्या दृष्टीने अर्थ प्राप्त होईल असे मत व्यक्त करून विद्यापीठांनी आपल्या पदवीपूर्व वर्गाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करून त्यात देशाचा इतिहास, संस्कृती-समाजजीवन, समस्या आणि विज्ञान यांचा परिचय करून देणारा पायाभूत अभ्यासक्रम समाविष्ट करावा, विविध शाखा-विषयांबरोबर त्यांचे व्यावहारिक उपयोग अन् प्रत्यक्षानुभव यांची जोड देणारे विषयही त्यात असावेत आणि शिवाय राष्ट्रीय अगर सामाजिक सेवेमध्येही विद्यार्थ्यांचा सहभाग ही गोष्टही अभ्यासक्रमात अंतर्भूत व्हावी असे महत्त्वाचे मार्गदर्शन त्यात केले होते.

विद्यापीठ अनुदानमंडळाने या गोष्टी सुचविताना धंदे-व्यवसाय-शिक्षण देणाऱ्या संस्थांचा अभाव, विद्यापीठात आणि महाविद्यालयात जमा होणारा विद्यार्थ्यांचा लोंढा विचारात घेतला नसावा. नाही तर,अभ्यासक्रमातील विषयांचा कार्यानुभव या विराट लोंढ्याला देणार कसा ? समाजसेवा वा राष्ट्रीय सेवा यात सर्वांना सहभागी कसे करणार ? या प्रश्नाची उकल मंडळाने केली असती मुंबई विद्यापीठाने अगदी धार्मिक निष्ठेने पदवीपूर्व अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली व ती राबविलीही. अनुभव असा की, पायाभूत अभ्यासक्रमात ना विद्यार्थ्यांना रस ना प्राध्यापकांना कारण कला, विज्ञान आणि वाणिज्य या तीन्ही शाखांत तो आवश्यक ठरविला होता तिथेच दुमत होते व्यवहारी विषयात कार्यानुभव देणे दुरापास्त ठरल्याने त्यांना सैद्धान्तिक विषयाचे स्थान प्राप्त झाले समाजसेवेचा विचका अवर्णनीयच होता

या साऱ्या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने, *विद्यापीठाच्या पंखाखाली*, व्यवसाय-धंदेशिक्षण देणारी संस्था संघटित करण्याचा जो धाडसी निर्णय अलीकडे जाहीर केला तो प्रशंसनीय म्हटला पाहिजे विद्यापीठाच्या विद्वत्सभेने त्याला मान्यता दिली आहे, पण प्रतिनिधीसभेची मान्यता या महिनाअखेर मिळाल्यानंतर या गोष्टीला मूर्तस्वरूप येईल. या संस्थेचा व्याप जसजसा वाढत जाईल तसतसे विविध क्षेत्रांतील अनेक व्यवसाय, सेवा, तंत्रे, कौशल्ये यांची कार्यानुभवाधिष्ठित शिक्षणाची सोय उपलब्ध होईल पुढेमागे असे शिक्षण देणाऱ्या विविध संस्था विद्यापीठाशी संलग्न करून घेता येतील. कारण विद्यापीठाच्या प्रमाणपत्राला अगर डिप्लोमाला एक वेगळी प्रतिष्ठा असते व्यापार-उद्योगाच्या गरजांप्रमाणे विविध अभ्यासक्रम घेतणे विद्यापीठाला शक्य होईल.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्राचार्य राम जोशी यांनी या संस्थेची उद्दिष्टे जाहीर केली ही संस्था ज्ञान आणि कौशल्य यांची सांगड घालील शिक्षण आणि रोजगारी यांचा मेळ घालील पारंपारिक शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण यांत सेतू बांधील आणि उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण करून, कुठल्या मार्गाने जावे या संदेहात पडणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांना रोजगारीची अगर स्वयंउद्योगाची नवी दिशा दाखवील वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणाचा तवा फुटायचा तर अशी संस्था उभी करणे आवश्यक आहे हे कुणालाही पटावे

या संस्थेचा संघटनात्मक ढाचा कसा असावा, त्यात खर्च कमी कमी करता येईल, व्यवसायधंदेशिक्षण देण्यासाठी व्यापार आणि उद्योगक्षेत्रातील अधिकारी व्यक्तींचा ' पाहुणे शिक्षकांचा ' वर्ग विद्यापीठाशी कसा संलग्न होईल, त्यामुळे या ' अर्थपूर्ण शिक्षणदानाचा ' उभयपक्षी कसा फायदा होईल, या गोष्टींचा ऊहापोह प्राचार्य राम जोशी यांनी विद्वत्सभेला सादर केलेल्या आपल्या छोट्या टिपणीत केला आहे संस्थेचे कार्य विविध क्षेत्रांसाठी कसे उपयोगी ठरेल हे सांगताना त्यांनी प्रामुख्याने चार क्षेत्रांचा उल्लेख केला. (१) सरकारी, निमसरकारी आणि सार्वजनिक संस्था या क्षेत्रातील रोजगारसंधी (२) व्यापारी क्षेत्रातील रोजगारसंधी (३) सहकारी व लघुउद्योगक्षेत्र (४) सेवाक्षेत्र. यात आणखी क्षेत्रांची भर घालता येईल. शिवाय व्यापारउद्योग आणि त्यांना लागणारे तंत्रकुशल मनुष्यबळ यांचा सांधा विद्यापीठरोजगारविनिमयकेंद्रामार्फत साधला जाऊन शिक्षणनिर्वाहसंबंध प्रस्थापित करून

वद्यार्थ्यांना शिक्षणात रस वाटेल अशी परिस्थिती आपोआप निर्माण होईल मग शिक्षणक्षेत्रातील शिस्तीचा वेगळा विचारच करावा लागणार नाही

विद्यापीठाला व्यवसाय, धंदेशिक्षणक्षेत्रात अगदी सुरुवातीलाही विद्यार्थ्यांची वाण भासणार नाही. व्यवसाय-धंदे-शिक्षण देणाऱ्या संस्था स्वयंपूर्ण तर आहेतच; पण त्याना बराच फायदाही होत आहे, ही गोष्ट विविध क्षेत्रात त्या त्या प्रमाणात हातपाय पसरीत आहेत यावरून सहज लक्षात येते. अशा सस्था नेहमी खूपच जास्त शुल्क घेतात त्यामुळे विद्यापीठाची व्यवसाय-धंदे-संस्था लवकरच स्वयंपूर्ण तर होईलच, पण शिवाय आपला विस्तारही स्वबलावर करू शकेल, नव्हे विद्यापीठाच्या उत्पन्नातही भर घालू शकेल. शिवाय विद्यापीठाने चाकोरीबाहेर पडून शिक्षणदानासाठी असे नवे क्षितिज खुले केल्याने केंद्र आणि राज्यसरकार सढळ हाताने अनुदाने देतील इथे निर्माण होणारा माल आपल्याला उपयोगी पडणारा आहे हे समजल्यावर व्यापारी आणि उद्योगपती आपली मदत, प्रोत्साहने आणि देणग्या देऊन विद्यापीठाच्या कार्याला भक्कम हातभार लावतील, यात शंका नाही. मुंबई विद्यापीठातल्या व्यवसाय-धंदे- शिक्षण संस्थेसाठी महाराष्ट्राचे एका ख्यातनाम उद्योगपतीकडून ३० लाख रुपयांची देणगी मिळविण्यात कुलगुरु प्राचार्य राम जोशी यशस्वी झाले आहेत असे समजते. ही गोष्ट माझ्या विधानाची सत्यता पटविणारी आहे. उशीरा का होईना, मुंबई विद्यापीठाने अशी चाकोरीबाहेरची, शिक्षणक्षेत्रात नवी क्षितिजे उजळविणारी योजना आखावी आणि ती प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याचा चंग बाधावा ही गोष्ट त्या विद्यापीठाच्या कीर्तीत भर घालणारीच आहे प्राचार्य राम जोशी आणि कुलसचिव प्रा. ग. म. राजर्षी त्याबद्दल अभिनंदनास पात्र आहेत. या कामी आमजनतेच्या शुभेच्छा खात्रीने त्याच्या मागे उभ्या राहातील !

☐

( 'मुंबई आकाशवाणी'च्या सौजन्याने )

कथा

# 'अंधाराची धार'

## राजा दीक्षित

तसा अधार इथून तिथून काळाच असतो, पण अंधाराचा हा काळा रंग मात्र एकच एक नसतो. त्याला वेगवेगळ्या छटा असतात. कमीजास्त धारही असते. उदाहरणार्थ, काल दिवा मालवून मी अथरुणावर पसरलो तेव्हाचा अंधार, मध्यरात्री घड्याळाचे बारा रुक्ष टोले खणाणले तेव्हाचा अधार आणि आजची ग्लूमी पहाट होण्याआधीचा अधार. या तिन्ही अधाराचे काळे रंग वेगवेगळे होते. प्रत्येकाची धारही वेगवेगळी होती. त्याच्यात साम्य फक्त एकच. वेगवेगळे असले, तरी सर्वच काळे रंग भयानक होते ! ..

अंधार हा मुंग्याच्या वारुळासारखाही असतो. उदाहरणार्थ, काल रात्री हे वारूळ फुटलं अधाराच्या असंख्य मुंग्या सन्नाट विखुरल्या. पिसाळल्या. मला कडकडून डसू लागल्या. मी काळानिळा होत होत अधाराचाच एक धारदार तुकडा बनलो...

तात्पर्य, काल रात्रभर मी टक्क जागा होतो !

वारूळ फोडलं मुख्यत बाबानीच मध्यतरी मी डबल ग्रॅज्युएट वगैरे झालो मी आमच्या कारकुनी घराण्यातला पहिलाच डबल ग्रॅज्युएट. पण बेकार ! आता, डिग्री मिळाली हा काही माझा दोष नाही आणि हज्जार प्रयत्न करूनही बेकार राहिलो हाही माझा दोष नव्हे ! ही सारी विद्यापीठ आणि सरकार या दयाघन मायबापाची कृपा ! तसेच नियती वगैरे असते ना कुणी तरी, तिचीही कृपा ! पण जणू काही सारा दोष आमचाच, अशी वागणूक अलीकडे आम्हाला घरीदारी मिळते. त्यातून आमच्या घराच आभाळ मुळात फाटलेलच. आता हे फाटलेल आभाळ शिवणं म्हणजे फाटलेली चड्डी शिवण्याइतक सोपं का आहे ? पण समस्त मडळीना तस ते वाटत बुवा ! उदड वाटत!

स्वप्नात सगळं शक्य असतं आणि स्वप्न पडण्यासाठी झोप लागावीच लागते असं नाही !

तर एकूण अस हे वातावरण. धुमसणारं. त्यातूनच काल एक मोठा भडका उडाला. तीर्थरूप परिपक्व बाबा आणि चिरंजीव सकलदुर्गुणालंकित आम्ही याच्यात कडाक्याच भाडण झालं. कारण तस क्षुल्लकच; पण भाडण प्रचड कडाक्याच बाबा आम्हाला जे काही बोलले ते वास्तविक आमच्या सहनशक्तीत सामावणारं नव्हत बाबाच ते नेहमीपेक्षा अधिकच वर्मी घाव घालणार बोलण, आईच भसाभस आगीत तेल ओतण आणि धाकट्या भावाच्या चेहऱ्यावरच कुजाट हसू ...सारच कसं सहन करण्यापलीकडच ! वाटलं, हे घर आपलं नाही (आपल्या बापाचं आहे.) आपण येथे परके आहोत. भार आहोत. आत्ताच्या आत्ता या घराबाहेर पडावं. निघून जावं किंवा जीव तरी द्यावा.. पण शेवटी चरफडत चरफडत का होईना, आम्ही थड झालो आमच्यात साली घराबाहेर पडण्याची धमक नाही ! आत्महत्या आमच्या तात्त्विक बैठकीत बसत नाही ! आम्ही मध्यमवर्गीय गाडुळं फक्त वळवळतो! आमचे तुकडे करा ना खुशाल...आमची आशावादी वळवळ थावता थावणार नाही ! तर, अखेर चरफडत मी झोपलो दिवा मालवला न् बघतो तर काय, आमच अधाराचं वारूळ आपलं यथेच्छ फुटलेलं ! उजेडात घरच्याना ते दिसल नाही. त्यामुळं त्यानी वारुळावर पाय दिले. ते फुटलं. वारूळच ते ! ...

कालचा दिवस एकंदरीतच प्रचंड वाईट गेला ! सकाळी उठल्यावर आरशात स्वत चं थोबाड पाहिल होत ! ...

सकाळी भावाशी नेहमीप्रमाणे भाडण

जुंपलं. हल्ली तो माझा वैरीच झालेला आहे ! वास्तविक त्यानं असं वैरी का बनावं ? आमच्या बापाची काही आमच्यात खुन्नस निर्माण करण्याइतकी इस्टेट नाही. जिच्यावरून आमच्यात मत्सर पेटावा अशी किमान बरी मुलगीही आमच्या वाड्यात नाही ! माझ्यापेक्षा भावाला परीक्षेत कमी मार्कस् मिळतात अशातलाही भाग नाही... पण तरीही ते लेकाचं माझ्याशी उभा दावा मांडून बसलय ! बरं, भांडतं ते सुद्धा अगदी बायकी पद्धतीनी आज तोच प्रकार सुरू झाला जाम भडकून त्याचं मुस्काड फोडलं. त्याची कड घेणाऱ्या श्यामच्या आईशीही भांडलो नंतर घराबाहेर पडलो. इराण्याच्या हॉटेलात जाऊन बसलो. आरशात हळूच स्वत च करारी रूपडं पाहिलं मिशीवर हात फिरवून घाम पुसून घेतला. दोनचार विड्या फुकल्या वेटरनं बोट बुचकळून दिलेल्या ग्लासातलं पेशल पाणी पोटात रिचवलं. वर चहाही ढोसला– दोनदा ! हॉटेलात शक्य तेवढा वेळ ढकलण्याचा प्रयत्न करत होतो. एक दाढी-शबनमवाला आउटसायडर बसला होता

हल्ली बाकी अशा आउटसायडर्सचं पीकच आलय म्हणा ! का ते असे भकास वागतात कोणास ठाऊक ? माझ्यासारखीच परिस्थिती असेल का त्याची ? क्षणभर वाटून गेलं की, हा दाढी–शबनमवाला म्हणजे आपलच प्रतिबिंब तर नव्हे ना ?... पण नंतर समजूतदार बनलो गाण्याच्या ठणठणाटात चक्क विचार वगैरे केला ! म्हटलं, डोक्यात अशी राख घालून घेण्यात अर्थ नाही गुरू ! मनाची खूप समजूत घातली की, आपण आशावादी आहोत . प्रयत्नवादी आहोत... लढनेवाले आहोत.. वगैरे वगैरे. डोकं थंड झाल्यावर हॉटेलातून बाहेर पडलो. माझा चेहरा तेव्हा बरा दिसत असावा !... हिंडताना वाटून गेलं, आपण आत्ता जुन्या फॅशनची बाजूला खिसे असणारी पॅंट घातलेली असायला हवी होती. पॅंटच्या खिशात हात घालून खांदे झुकवून शीळ मारत आपल्याला हिंडता यायला हवं होत. चप्प तेल लावून बसवलेला छानसा कोंबडा डोक्यावर हवा होता.... आणि... समोरून आपली साडी नेसलेली नायिका लाजाळू नजरेच भिरभिरं घेऊन यायला हवी होती. मग जे व्हायचं ते सगळं कसं यथाक्रम व्हायला हवं होत... शिवाय तिच्या प्रेमळ बापाची भरपूर इस्टेटही असायला हवी होती !...

एकदम रोमॅंटिकच मूड आला मजेत हिंडत सुटलो अन् गंमत अशी की, रस्त्यात नंदिता स्वीट दिसली ! पण.. फक्त दिसलीच ! मी ओळख देऊनही भोसडीची हासली म्हणून नाही ! पुन्हा एकदा टाळकं जाम सणकलं. च्यामारी, ही टवळी चार वर्षं माझ्या वर्गात होती. चांगली ओळखीची; पण लग्न झाल्यावर ओळखच देईनाशी झाली ! काय बॉं ह्या संकुचित पोरी ? अरे, लग्न झालं म्हणून काय जुनी ओळख विसराल ? नवऱ्याशिवाय इतर पुरुष तुम्हाला साधं हसायलाही वर्ज्य ? हृया भलत्याच पातिव्रत्याला काय म्हणाव ? आणि उद्या समजा नवरा मेलाच, तर तू का सती जाणार आहेस का बोडकी बनणार आहेस ? हॅं ऽऽ !... जाम मूड गेला. बाय द वे, तसा पूर्वी मी नंदितावर जरा मरायचोच; पण आमचं आपलं मध्यमवर्गीय बुजरं प्रेम ! मनातल्या मनात केलेलं आणि मनातल्या मनातच मेलेलं ! तारुण्य बरबाद करण्याचा करंटेपणा करावा तर तो आम्हीच ! आमची मजल आपली पोरीशी थोडंसं बोलण्यापर्यंत. तेही अर्थात् हवापाण्याचं. जोडीला कधी तरी कौटुंबिक छापाचे विनोद ! आणि औपचारिक हसणं . साहजिकच नंदितासारख्या पोरीला कुठला तरी गाडीवाला टकल्या पळवणार .. तीही ओळख न देता रुबाबात निघून जाणार... टकल्या रे टकल्या, काय तुझी मजा, आम्ही वाजवतो बेंडबाजा !... थू तिच्यामारी ! . टकल्या आणि नंदिता जहन्नुममे...

.. पण काही म्हणा, एक खपली उडालीच बाकी ! गंमत अशी की, मुळात जखम अशी झालेलीच नव्हती. नंदिताला आम्ही इष्काचं विचारलं असतं, तिनी नकार दिला असता, आम्ही प्रेमभंगी झालो असतो... तर जखमेचा प्रश्न होता ! तसल्या जखमेतही एक मजा असती यार. (असं म्हणतात ) दिलको ऐसा दर्द तो होनाही मंगता है भई; पण आम्ही मनातल्या मनात मरण्याखेरीज केलंच काय ? तर, एकदरीत जी खपली उडाली, तीही खरं म्हणजे न झालेल्या जखमेवरचीच !

आजच्याच सुमुहूर्तावर दुपारच्या प्रहरी आयुष्यातला पाचवा इंटरव्ह्यू झाला...नेहमीसारखाच !.. चार आगाऊ खाटिक समोर बसलेले. मोठ्या ऐटीत !...त्याच्या टाळक्यावर फिरणारा पंखा, टेबलावर पडलेलं विल्सचं पाकीट आणि बहुतेक फ्रीजमधल्या पाण्याने भरलेले स्वच्छ ग्लास–या सगळ्याची खरी गरज आम्हाला होती, पण आम्ही आपले स्वत ला सावरत त्याच्यासमोर अदबीनं ताटकळलेलो ! त्याचे थोर प्रश्न... मेघालयाची राजधानी कोणती ? भारताचे ऊर्जामंत्री कोण ? भवभूतीच्या नाटकाविषयी तुम्हाला काय माहिती आहे ? झिंबाब्वेबद्दल तुम्हाला काय माहिती आहे ? हल्लीचे चित्रपट समाजाला तारक आहेत का मारक ? या आधी तुम्हाला कामाचा काही अनुभव? . असे अनेक प्रश्न अडखळत, घाम पुसत आणि मुख्य म्हणजे इंग्लिशात आम्ही दिलेली उत्तरं. टेन्शनमुळे झालेल्या अनेक चुका, चरकातून पिळून निघाल्यागत आमची अवस्था ! खाटकाच्या चेहऱ्यावर मात्र छद्मी भाव, आमच्यावर कोसळणाऱ्या त्याच्या तुच्छ नजरा... चोरानो, तुमचे इंटरव्ह्यूज् कधी कोणी घेतलेच नाहीत का रे ? आमच्या ज्ञानाचा पंचनामा करणारे तुम्ही कोण टिकोजीराव ?...

तर एकूण नोकरीची आशा नाहीच. नोकरी आम्हाला अल्लाउद्दीनच्या जादूच्या दिव्याइतकीच प्रिय आणि अप्राप्य आहे ! हे बेकारीचं जिणं आता असह्य झालंय. कशातच लक्ष लागत नाही. अन्नाचा घास गोड लागत नाही. घरात सदैव कचकच डोक्यात सदैव भणभण असल्या सगळ्या परिस्थितीत निदान एखादी प्रेयसी वगैरे असती तरी बरं झालं असतं तिच्या लाघवी दिलाशावर खोटं खोटं का होईना, समाधान मिळालं असतं काही काळ तरी आमच्या आयुष्याचा हिंदी पिक्चर झाला असता ! पण सध्या सर्वच बाजूनी अंधाराचं आक्राळविक्राळ तांडव आम्हाला पोरी गटवायची हुषारी नाही. आम्हाला नोकरी मिळवता येत नाही धंद्यासाठी भांडवल नाही धाडस तर नाहीच नाही ! भीक मागायची लाज वाटते. बुट–पॉलिश करायची लाज वाटते. चोऱ्या करायची भीती वाटते घरातून पळून जायचीही भीती वाटते. आत्महत्याही करता येत नाही.. आमच्यात भल्या–बुऱ्या कोणत्याच मार्गाने ही सगळी कोंडी फोडण्याची ताकद नाही...

तर एकंदरीत कालचाही दिवस फार वाईट गेला रात्री तर अंधाराचं वारूळ यथेच्छच फुटलं. आजचा पांढरा फटफटीत दिवस एखाद्या क्षयरोग्यासारखा पुढे उभा आहे संध्याकाळनंतर तो पिरपिरत मरेल. मग पुन्हा रात्र ! पुन्हा अंधार मग पुन्हा क्षयी दिवस आणि कभिन्न रात्री असं हे अखंड दुष्टचक्र! ...अंधार...सर्वदूर काळाभोर ..भयंकर ... धारदार ... माझ्यात... मीच अंधारचा एक धारदार तुकडा... □

# खैबरनामा

विजय परुळकर

आज मंगळवार तारीख ७ ऑक्टोबर १९८०. संध्याकाळी पुण्यातील एका प्रतिष्ठित क्लबच्या बारमध्ये काही बुजुर्ग मंडळींबरोबर मी खारे मसाल्याचे काजू आणि वेफर्स खात व्हिस्की पीत बसलो होतो. चाकणच्या कांदेवाले जोशीबुवांच्या शेतकरी संघटनेनं उभ्या केलेल्या उसाच्या आंदोलनाबद्दल जुजबी चर्चा झाल्यानंतर टेबलाभोवतीची मंडळी आपण देखील पुणे जिल्ह्यातील एखाद्या खेड्याच्या विकासाबद्दल काही तरी केलं पाहिजे, अशा प्रकारची वरवरची बोलणी करण्यात रंगली होती. ग्रामीण विकासाबद्दलच्या Informal discussion टाइपच्या ‘सहज गप्पागोष्टी’ चालू असताना मधेच एक वयोवृद्ध टायधारी पंडित मेलव्हिल डिमेलो जसं मराठी बोलेल त्या थाटात, तोंडातील पाइप चघळत म्हणाले–

“विऽऽ जॉय् टू हे खैबरनामा काय म्हीत बसलाय? हे इराणी लोक एकदम मट्ठ डोक्याचे! -mutton headed, भय्यंक्कर मंदबुद्धी! एकदम फॅनॅटिक. त्यांचा आयातोल्ला खोमेनी तर मॅड माणूस! इराकबरोबर वॉर करून कंट्रीचा सगळा सत्यानाश चालवलाय! ऑइलचं आता केव्हढं मोठं अडचण निर्माण होणार!! आणि ह्या असल्या लोकांचा हिस्ट्री आणि कल्चर टू खैबरनामामधून आम्हाला सांगतो! काय उपयोग? अरे, तू मॅकॉलेचा हिस्ट्री वाच, वेबरचा वाच. ते खरा हिस्टोरियन, खरा इतिहासकार, नाही तर तुमचा तो पोतदार का राजवाडे! ह्यांना हिस्ट्री कशाशी खातात ते तरी माहीत आहे काय? तू ब्रिटिशांना सारखा सारखा ‘अवर्ण’ म्हणतो; पण खरा कल्चर फक्त त्यांच्याचकडे आहे हे लक्षात ठेव! अरे, मी ‘युके’मध्ये गेलोय, राहिलोय...इंग्लंड!!... वंडरफुल कंट्री. वंडरफुल पीपल! अरे, त्यांनी इंडियावर राज्य केलं हे तुझ्या ‘हिंद’चं भाग्य समज! – हे रेल्वे, हे टेलिग्राफ, हेऽऽ एज्युकेशन– हेऽऽऽ अॅडमिनिस्ट्रेशन आणि तुम्ही काय म्हणता ते कायदा आणि सुव्यवस्था... हे सगळं आज इंडियात आहे ते कुणामुळे? बोल! हे सगळं फक्त ब्रिटिश लोकांच्यामुळे!! तू त्यांना बिनरंगी म्हण, अवर्ण म्हण, पण ब्रिटिश लोक ग्रेट हे फॅक्ट तुला अॅक्सेप्ट करायलाच पायजे! तुझा तो इराणचा सायरुस का दारियुस ग्रेट नाही. लॉर्ड मॉउंटबॅटन ग्रेट! मॉंटगोमेरी ग्रेट!! फील्ड मार्शल रोमेल ग्रेट!!!–जनरल मॅकार्थर ग्रेट!!!! टू सेकंड वर्ल्ड वॉरचं लिटरेचर वाच. सर विन्स्टन चर्चिल वाच! मग तुला खरा इतिहास समजेल. टू ब्रिटिश लोकांना हरामी म्हणतो; पण हे अरब, हे इराणी काय कमी हरामी आहेत! अरे कसल्या फडतूस इराण्यांचा इतिहास ल्हीत स्वतःचा आणि आमचा टाइम वेस्ट करत बसलायस्! ल्ह्यायच्याच झाला तर अमेरिका किती प्रोग्रेस करून राहिलाय त्याबद्दल लिही! ह्या फॅनॅटिक आयातोल्ला खोमेनीच्या देशाचा, त्यांच्या टिनपाट शहांचा इतिहास आम्हाला कशाला सुनावतोस?”

– टायधारी, पाइप चोखणारे वयोवृद्ध ‘पंडित’ बराच वेळ असंच काहीसं बोलत राहिले. ग्रामीण विकासाचा विषय बाजूला पडला होता. पुण्यामधील प्रतिष्ठित क्लबच्या बारमधील अमेरिकी थाटाच्या –म्हणजे जरा जास्त–एअरकंडिशनिंगमुळे मी काहीसा गारठलो होतो; पण ‘व्हिस्की’ आणि ‘पंडित’ वक्तव्य ह्यामुळे शरीरातील उष्णता हळूहळू वाढत होती, त्यामुळं बरं वाटत होतं. मनात म्हटलं, बोलने दो पंडितको. अपना क्या बिघडता है! पंडित ‘खैबरनामा’ पढता है ये भी क्या कम है!”

– व्हिस्कीचा नवा ‘राउंड’ सुरू झाला आणि कसा कुणास ठाऊक पुन्हा एकदा ग्रामीण विकासाचा विषय सुरू झाला. विझलेला पाइप पुन्हा पेटवत, भका भका धूर सोडत ‘पंडित’ काहीशा चिडीनं म्हणाले–

“आणि टू इराणमधल्या विकासयोजनांची तुलना आमच्या येथील डेव्हलपमेंट, प्रॉजेक्टस् आणि ‘ट्रस्ट’ बरोबर करतोयस हे तर एकदम चूक आहे. this is not fair. आपल्या ‘कंट्री’मध्ये महात्मा गांधीजींचं ध्येय डोळ्यांसमोर ठेवून देशासाठी त्याग करणारी मोठी मोठी माणसं आहेत त्यांची टू चेष्टा करणं बरोबर नाही! सेकंड ऑक्टोबरला आपण आता संजय गांधी निराधार योजना सुरू केली. हजारो लोक ह्या योजनेचा फायदा घेण्यासाठी, फार्म मिळविण्यासाठी क्यू लावून आहेत. काहीजण चेंगरून मरताहेत. ह्याचाच अर्थ लोकांना योजना मनोरंजन पसंत पडली असा आहे. दुसऱ्या कुठल्या

देशात आहे का अशी योजना ?– बोल ?"

मनात आलं ह्या पतितजींना सांगावं 'टायधारी पाइपमहाराज' दुसऱ्या कुठल्याच देशात इतके निराधार लोक मी पाहिले नाहीत. त्यामुळे अशा प्रकारची धर्मादाय योजना पहाण्याचं भाग्य मला मिळालं नाही' त्याचबरोबर ह्या पाइपचघळ्याला विचारावसं वाटलं– 'योजना सुरूच करायची होती तर त्यासाठी दोन ऑक्टोबरची वाट पहाण्याचं कारण काय ?– आणि तुमच्या महात्माजींच्या नावाशी संजय गांधींचा संबंध जोडण्याची गरज काय ?' पण गप्प बसलो. कारण आजकाल असले प्रश्न कुणी उघडपणे विचारीत नाही !

मी गप्प बसलो ह्याचा अर्थ मी निरुत्तर झालो असा समज झाल्यामुळे टायधाऱ्याचं देशप्रेम मग एकदम उफाळून आलं. दोन ऑक्टोबर, महात्मा गांधी आणि आता संजय गांधी हे शब्द कानावर पडले की, अशा लोकांचं देशप्रेम उतू जाणं सहाजिकच आहे. तशीच अवस्था टायधाऱ्याची झाली ते मला 'ग्रेट इंडियन कल्चर' वर भलं मोठं लेक्चर झोडू लागले. गंमत वाटून हूं आवरत मी व्हिस्की पीत राहिलो.

¤

आतापर्यंत 'खैबरनामा'चे दहा लेख प्रसिद्ध झाले. काही प्रतिक्रिया कानी आल्या–'रेझाखान, रेझाशहा, अमका शहा, ढमका शहा, शहेनशहा– ह्या सगळ्या शहामंडळींची नावं लक्षात ठेवताना आमचा काहीसा गोंधळ उडतो'– अशी मुख्य तक्रार होती. एक म्हणाला 'ह्या शहांची माहिती सांगताना तारखा आणि संदर्भ विस्तारानं दिल्यास मदत होईल.' दुसरा म्हणाला–' मधूनच तू पर्शिया असं लिहितोस आणि मग इराणबद्दल काही तरी सांगतोस त्यामुळे काहीसा गोंधळ उडतो.' आणखी एकाचं म्हणणं– 'माहिती त्रोटक वाटते, तू कुठून निघून कुठं जाणार ह्याचा अंदाज येत नाही मधूनच नेहरू किंवा सुकार्नो ह्यामुळे 'लिंक' तुटते जे लिहायचं ते सरळ सरळ खैबरखिंडीपल्याडचं लिही !.' एक सत्याशोधक म्हणाले की, 'तुझं हे 'हिंद–हिंद' जरा जादा होतंय' आणि दबक्या आवाजात त्यांनी प्रश्न विचारला– "तू आर एस्. एस्. चा तर नाहीस ना ?"

ह्या सर्व प्रतिक्रिया ऐकून खैबरनामा लिहिण्याची प्रेरणा किंवा त्यामागील भूमिका थोडी स्पष्ट करणं आवश्यक आहे असं मला वाटू लागलं आहे. वास्तविक सर्फराझबरोबर शिराझमध्ये साआदी आणि हाफीजच्या कबरींना सलाम करून नंतर जे अनुभवलं त्याबद्दलचा 'लेखांक अकरा' तयार आहे; पण आता दिवाळी आली आहे. 'माणूस'च्या दिवाळी अंकापूर्वीचा हा शेवटचा अंक ! त्यानंतर आपली भेट दिवाळीनंतर ! ह्या दिवाळीच्या शुभेच्छा वगैरे देताना सुद्धा मन कचरावं अशी सध्याची परिस्थिती !

शहरी लोकांची दिवाळी नेहमीच आनंदाची जाते. मुंबईसारख्या शहरात फटाक्यांचे हजार हजार रुपयांचे 'कोट' निद्रानाशाचा रोग असणाऱ्यांच्या कानठाळ्या बसविण्यात धुंद झालेले असतात हजारो रुपये फटाक्यावर खर्ची घालणाऱ्यांची दिवाळी आनंदातच जाणार ! प्रश्न आहे तीन दांडीचं लुगडं नेसणारी ग्रामीण भारतीय नारी, फाटक्या पंरणीतला तिचा ग्रामीण भारतीय नर आणि कुल्ल्यावर फाटलेली चड्डी घालणारा भारतमातेचा सुपुत्र–ह्यांची दिवाळी कशी साजरी होणार ? असो. हा जरी आजचा ज्वलंत विषय असला तरी खैबरनामाच्या संदर्भात हे काहीसं विषयांतरच ठरेल ! ज्वलंत विषयाकडे मायबाप सरकार संजय निराधार योजनाद्वारा पहातच आहे...त्यातूनही आणखी काही ज्वलंत प्रश्न शिल्लक राहिलेच तर ते सोडविण्यासाठी राजीव गांधींची मनधरणी आपले लाडके नेते करीत आहेतच ! तेव्हा आपण त्याविषयी काळजी करण्याचं फारसं कारण नाही.

हा अंक आपल्या हाती पडल्यानंतर काही दिवसांनीच आपण सर्वजण दिवाळीचा सण साजरा करण्याच्या कामी लागणार आहोत. ज्या देशाविषयी मी 'खैबरनामा' ह्या मालिकेतून लिहिण्यास सुरुवात केली तेथील परिस्थिती मात्र दिवसेंदिवस बिकट आणि गंभीर होत चालली आहे. पूर्वनियोजित 'लेखांक अकरा' दिवाळी संपेपर्यंत बाजूस ठेवून वर्तमानाची दखल घेणं आवश्यक वाटण्यासारखी ही परिस्थिती आहे. खैबरनामाच्या दहाव्या लेखानंतरचा पुढील लेख अशा दृष्टीनं ह्या लेखाकडे पाहू नये अशी वाचकांना विनंती. शीर्षक 'खैबरनामा' असलं तरी हा एक स्वतंत्र लेख आहे असं मानावयास हरकत नाही.

¤

इराण आणि इराकमध्ये युद्ध पेटलं तेव्हा मी चाकणचं कांदा आंदोलन यशस्वी रीतीनं उभं करणाऱ्या शरद जोशींबरोबर त्यांच्या शेतकरी संघटनेच्या उसाच्या आंदोलनाचा अभ्यास करत फिरत होतो. खैबरनामामधून तुम्हाला मी जेव्हा १९७२ साली इराणमध्ये प्रथम गेलो, महिनाभर सगळा इराण भटकलो, त्या प्रथम भेटीत इराणमध्ये जे पाहिलं, अनुभवलं, ऐकलं, वाचलं त्याबद्दल सांगत होतो आणि दिवाळीनंतर पुन्हा सांगणार आहे.

इराणचा पहलवी घराण्याचा शहेनशहा मोहम्मद रेझाशहा पहेलवी आर्यामेहर एक पदच्युत राजा म्हणून कैरोमध्ये पैगंबरवासी झाला. त्याचा बाप रेझाशहा–ज्यानं पहेलवी घराण्याची स्थापना केली–ह्याला देखील दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी–१६ सप्टेंबर १९४१ च्या पहाटे आपला देश सोडावा लागला आणि तो देखील परदेशात मरण पावला ! त्या वेळी जर्मनीशी सामना करताना खिळखिळ्या झालेल्या इंग्रजांनी रशियाशी हातमिळवणी करून, चर्चिलच्या फर्मानानुसार (होय–हे लोकशाही मानणारे लोक देखील एकतर्फी फर्मान काढीत) सरळ सरळ इराण काबीज केला !

आज पहेलवी घराण्याचा राजपुत्र रेझा ह्यानं कैरोमध्ये एका लहानशा समारंभात स्वतःला इराणचा शहा असं जाहीर केलं आहे. त्यापूर्वी अमेरिकेचे मांडलिक असलेल्या इस्त्रइलमधील अवर्ण ज्यू लोकांनी जेरुसलेम ही इस्त्राइलची राजधानी असल्याचं घोषित केलं होतं. इस्त्रइलच्या ह्या एकतर्फी घोषणेनं सारा अरबस्तान पेटून उठला होता. धर्मयुद्धाच्या–जिहादच्या घोषणा करू लागला होता. अमेरिकेमध्ये कार्टरची निवडणूक जवळ आलेली अफगाणिस्तान रशियाच्या ताब्यात इराणमध्ये अमेरिकन दूतवासाचे कर्मचारी अजूनही स्थानबद्ध. ह्या सर्व गोष्टी जर विचारात घेतल्या तर इराक आणि इराणमध्ये एकाएकी पेटलेल्या युद्धामागे कुणाकुणाचे हात आहेत ह्याचा थोडाफार अंदाज येईल.

महाराष्ट्रामध्ये सध्या सर्वात महत्त्वाची घटना उसाला रास्त भाव मागणाऱ्या शरद जोशींच्या शेतकरी संघटनेने उभ्या केलेल्या आंदोलनाची आहे–संजय निराधार योजना किंवा कर्जमाफी वगैरे नाही. त्याचप्रमाणे नजदीकच्या काळातील आपल्या सूर्यमालिकेतील सर्वात महत्त्वाची घटना (–असे अवर्ण पत्रकाराचे म्हणणे !)–म्हणजे कॉलगेट टूथपेस्टच्या जाहिरातीप्रमाणे वत्तिशी दाखविणाऱ्या, अमेरिकेच्या कार्टरची निवडणूक ह्या अमेरिकन लोकाना आपला प्रेसिडेंट हा फक्त ह्या पृथ्वीचाच नव्हे तर संपूर्ण सूर्यमालिकेच्या आणि आकाशगंगेतील इतर कोटयवधी सूर्यमालिकाचा देखील 'हेर प्रेसिडेंट' असल्यासारखं वाटतं. त्याना त्याच्या प्रेसिडेंटबद्दल काय वाटावं हा वास्तविक आपला प्रश्न नाही; पण ह्या प्रेसिडेंटच्या देशामधील वार्ताहर इतर देशाच्या नेत्याविषयी जे मनमानेल ते लिहीत असतात (आणि त्याचे मराठी भाषांतर आपण आपल्या प्रतिष्ठित मराठी वर्तमानपत्राच्या संपादकीयामधून वाचत असतो) ते विचारात घेता 'अमेरिका चालविणाऱ्या' काही पाताळयंत्री घटकांना जर कार्टरनेच ही निवडणूक जिंकावी असे वाटत असेल तर त्यासाठी ते आपल्या देशातील लोकमत जागृत (किंवा विचलित) करण्यासाठी मध्यपूर्वेत तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी पाडण्यास देखील मागेपुढे पहाणार नाहीत

वास्तविक युद्धाला तोंड फुटायचे अरब आणि अमेरिकेचे मांडलिक असलेल्या इस्त्राइली लोकांच्यात; पण मधेच इराक–इराण इथं आग पेटली आहे ही आग मध्यपूर्वेत पसरवायची की नाही हे रशिया, युकेचे इंग्रज आणि अमेरिकेचे अवर्ण सध्या गुप्त वाटाघाटीनं ठरवीत असणार. ही आग भडकविण्यात त्यांचा फायदाच आहे.

इराणला नामोहरम करण्यात इराकला जर यश मिळालं, आयातोल्ला खोमेनीला दाती तृण धरून अपमानास्पद पराभव स्वीकारावा लागला (–तसा त्याला तो पत्करावा लागावा अशी अनेकांची इच्छा आहे) तर ह्या हत्याकांडाचा महत्त्वाचा फायदा म्हणजे अमेरिकन 'ओलिसाची' सुटका ! तसे झाले तर कार्टर निवडणूक जिंकणार हे निश्चित आणि कार्टरने निवडणूक जिंकावी अशी तर अमेरिकेचे सरकार चालविणाऱ्या पाताळयंत्री लोकांची कोशीश आहे. म्हणजेच काय तर समीकरण सोपे आहे; पण रशियाचे सहाय्य (अमेरिकाला) नमल्यास मात्र अवघड आहे ! कठपुतळ्यांचा नाच चालू आहे, एक दोरी अमेरिकेच्याच हातात, एक रशियाच्या आणि बॅक ग्राउंड म्युझिक इंग्रजाचे !

मध्यपूर्वेत, खैवरखिंडीपल्याड अशी परिस्थिती असताना, खिंडीअल्याड, आपल्या देशात वेगळा काही कठपुतळीचा नाच चालू असण्याची शक्यता आहे का ?– निश्चितच नाही ! पंधरा ऑगस्टपासून सुरू झालेल्या जातीय दंगलीमध्ये 'परकीयाचा' हात असावा किंवा 'चाकणच्या जोशींनी उभ्या केलेल्या उसाच्या लढ्याला सी. आय.ए. ची मदत आहे' अशा फालतू प्रचाराकडे दुर्लक्ष करून, दिल्लीमध्ये काय चालू आहे ह्याचा बारकाईने विचार केल्यास हे सहज कळण्यासारखे आहे

खैवरखिंडीअल्याड आपल्या सीमेवर युद्ध पेटण्याची शक्यता कितपत आहे ?– जबरदस्त आहे ! सर्व भागच पेटला आहे मग आपली उत्तर सीमा पेटली तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही असू नये. हे युद्ध आपण पेटवणार का आपल्यावर लादले जाणार ?

आपला ऑल इंडिया रेडियो आणि दूरदर्शन आपल्याला जरी 'सारे कसे शांत शांत' आणि 'गोड गोड' असल्याचं सांगत असला तरी खरी परिस्थिती काय आहे ? देशामध्ये कशा प्रकारची आंदोलने उभी होत आहेत ? कुणी शेतमालाला रास्त भाव मागत आहे, कुणी भाववाढीबद्दल उग्र निदर्शने करीत आहे ! ग्रामीण भागातील असंतोष तर वाढतोच आहे. ज्याच्या हाती वार्ताप्रसारणाची माध्यमे आहेत त्यानी ह्याबद्दल तोंडाला किंवा लेखणीला खीळ घालायचा सोयिस्कर निर्णय जरी घेतला असला तरी त्यामुळे असंतोष कमी होणार अशातला प्रकार नाही ! म्हातारीच्या कोंबड्याची गोष्ट माहीत असून देखील डोळ्यावर झापडं ओढण्याचं ठरवलं तर ते मूर्खपणाचं ठरणार आहे. शहरातील मध्यमवर्गीय वर्तमानपत्रातील गुळमुळीत बातम्या वाचून नुसताच गोंधळून गेला आहे. कुठं तरी कसला तरी लढा चालू आहे आणि त्याचा आपल्या जीवनमानावर परिणाम होणार एव्हढं त्याच्या ध्यानात आलंय इराक–इराण-युद्धामुळं महागाई वाढणार असं देखील त्याचं मत झालं आहे. (करून देण्यात आलं आहे.)

अमेरिकेत कार्टरची निवडणूक– मध्यपूर्वेत तिसऱ्या महायुद्धाची शक्यता– आपल्या इथं काही मुख्यमंत्र्याना लवकरच निवडणुकीच्या मैदानात उतरायचं आहे... आता आपले हे लोकप्रिय मुख्यमंत्री निवडणुका जिंकून यशस्वी होतीलही, पण समजा एखादा हरला आणि नेमकी त्याच वेळी मध्यपूर्वेतील स्थिती 'गंभीर' झाली, तर आपल्या सीमाप्रांतात युद्ध 'लादले' जाण्याची शक्यता आहे का ? असेल तर त्या वेळी ग्रामीण भागात सुरू होणाऱ्या, मूळ धरू पहाणाऱ्या आंदोलनांचा टिकाव लागण्याची शक्यता आहे का ?–......

'जय जवान–जय किसान' ह्या नाऱ्यानं मंत्रमुग्ध होणारे आम्ही लोक; पण आम्हाला खरोखर आमच्या जवानाबद्दल, किसानाबद्दल आस्था आहे का ? जवान सुखात असतील (शांततेच्या काळात तरी) पण किसानांची अवस्था काय आहे ?– स्वातंत्र्यानंतर तेहतीस वर्षांनी हा प्रश्न विचारला तर तो चुकीचा आहे का ?

–इराणमध्ये शहेनशहा, मोहम्मद रेझा पहेलवीनं सामान्य किसानांसाठी 'श्वेतक्रांती' सुरू केली; पण त्या क्रांतीमधून सामान्य किसानाच्या पदरी काय पडलं ? त्याची स्थिती खरोखरच सुधारली का ? हा शहेनशहा अमेरिकन चित्रपटात दाखवतात त्याप्रमाणे मूर्ख आणि सत्तांध 'डिक्टेटर' नव्हता. त्याला स्वतःच्या इराणबद्दल अपरंपार प्रेम आणि अभिमान होता ! त्याला इराण प्रगतिपथावर न्यायचा होता. त्याची दिशाभूल कुणी केली आणि त्याच्याबद्दल, त्याच्या देशाबद्दल आम्ही आमची जी मतं बनवली ती कशाच्या आधारावर ? अमेरिकन वृत्तवितरणसंस्थानी 'पुरविलेल्या' बातमीपत्रावरूनच ना ! ह्या वृत्तवितरणसंस्था आपल्या भारताबद्दल जगामध्ये कुठल्या प्रकारच्या बातम्यांचा प्रसार करतात ? त्या बातम्या वाचून जगातील इतर देशाचं आपल्या भारताविषयी काय मत होत असेल ? हे सगळेच प्रश्न त्रासदायक आहेत त्याला उत्तर मा साठेंनी सांगितलेला रंगीत दूरदर्शन नाही सगळी नुसती फसवणूक चालली आहे ! जागृतीऐवजी मूळ ज्वलंत प्रश्नावरून सर्वसामान्याचे मन विचलित करणे करावे ह्यासाठी सार्‍या प्रसारयंत्रणांचा वापर केला जात आहे.

लेख 'खैबरनामा' ह्या शीर्षकाखाली लिहिला जातोय ह्याची मला जाणीव आहे, पण हा लेख दहाव्या लेखानंतरचा 'लेखाक अकरावा' नाही. लेखाक अकरा दिवाळीनंतर !

¤

इराक–इराणमध्ये चालू असलेलं युद्ध हे हरामी लोकानी स्वत च्या स्वार्थासाठी पेटवलं आहे आणि आपल्या इथं सुरू होणारा लढा ह्या हरामी लोकाचे हस्तक दाबण्याचा प्रयत्न करीत आहेत. इराक–इराण युद्धामधून हराम्यांचा तात्पुरता फायदा निश्चित होणार आहे; पण आपल्या इथं ग्रामीण भागातून लढ्याची जी नांदी सुरू झाली आहे तिच्यावर पडदा पाडणं आता प्रस्थापितांना शक्य नाही ! नांदीनंतर पडदा उघडणार आणि प्रत्यक्ष नाटक सुरू होणार !

पहिल्या अंकाचा पहिला प्रवेश चाकणच्या कांद्याच्या आंदोलनाचा. प्रामाणिक उपोषण, लाठीमार वगैरे; दुसरा प्रवेश उसाला रास्त भाव मागण्याच्या लढ्याचा. बेताल भाषा, टाळीची वाक्यं, जनजागृती, वाटाघाटी, दडपशाही आणि कदाचित काही हिंसाचार ! पहिल्या अंकाचा तिसरा प्रवेश सुरू होणार कापूस आणि खाद्यतेलाच्या आंदोलनाचा. त्या वेळी लाठीची जागा मशिनगन घेणार ! शब्दाची जागा रक्त घेणार !–असा हा पहिला अंक लिहून तयार आहे नांदी सुरू झाली आहे, पडदा वर जाण्याचाच अवकाश आहे !

तोपर्यंत इराक–इराणचे युद्ध संपलेले असेल त्या भागाशी आपला व्यापारी संबंध आहे. तेथून येणाऱ्या तेलावर आपल्या शेतकऱ्यांची इंजिनं आणि पुढाऱ्यांच्या मोटारी चालतात. पश्चिम आशियाशी– म्हणजेच इराणशी आपले फार पुरातन असे सांस्कृतिक लागेबांधे आहेत. टायधारी, पाइप ओढणारा वयोवृद्ध 'पंडित' त्याना जरी mutton headed– भयंकर मंदबुद्धी–धर्मवेडे वगैरे म्हणत असला तरी आपल्याकडील मुरादाबाद विसरून आपण ह्या वेदकालीन भाईबंदाशी जवळीक निर्माण करण्यासाठी जागरूक असलं पाहिजे. त्यांच्याकडून आपल्याला खनिज तेल मिळतं हे तर सत्य आहेच, त्याचबरोबर आपल्याकडील सुशिक्षित बेकाराना किंवा सुतार, गवंडी, फिटर, टर्नर वगैरे कारागिराना ह्याच देशात चांगल्या प्रकारच्या नोकऱ्या मिळतात आणि त्यातून असंख्यांचं जीवनमान सुधारतं हे विसरून चालणार नाही.

इराक-इराणमधील लढाई संपली की रशिया, अमेरिका आणि युरोपमधील देश त्याना पुन्हा लढाऊ विमाने, रणगाडे, शस्त्रास्त्रे वगैरे पुरवून आपल्या देशातील कारखानदारीला उजळा आणतील, बेकारीचा प्रश्न सोडवतील, हे निश्चित त्याचसाठी तर ह्या देशाना जगात कुठं ना कुठं लढाई चालू ठेवणं आवश्यक असतं आणि हे भांडवलदार आणि कारखानदार संगनमत करून अशा लढाया सुरू करतात ह्याबद्दल भरपूर पुरावा आता उपलब्ध आहे.

शहेनशहा आर्यामेहर पहेलवी ह्याच्या शेवटच्या वर्षातील कारकीर्दीत इराण आणि हिंदमधील संबंध अतिशय सलोख्याचे होते. ( बंगलादेशच्या लढाईनंतर ) अफघाणिस्तानची हिंदबरोबर सदैव मैत्री. हे दोन देश आपल्या दृष्टीनं अतिशय महत्त्वाचे आहेत पाकिस्तान हा हट्टानं 'धार्मिक' कारणामुळं हिंदुस्थानपासून वेगळा झालेला देश आहे. त्याची-आमची मूळ संस्कृती एकच; पण कधी काळी समझोता होईल हे अशक्य! बंगलादेशच्या लढाईनंतर आज भारतामध्ये पाकिस्तानपेक्षा जास्त मुसलमान आहेत आणि त्यापैकी अनेकाना अजूनही भारतामध्ये राहताना 'अस्थिर' वाटतं हे त्याना आणि तथाकथित कट्टर हिंदुधर्मीयाना लाच्छनास्पद आहे !

भारतामधील स्वतःला आर्य म्हणवून घेणारे हिंदू आणि पाकिस्तानमधील स्वत ला मुसलमान म्हणवून घेणारे हिंदुस्थानी आणि भारतामधील स्वत.ला मुसलमान म्हणवून घेणारे भारतीय ह्या सर्वांच्या संस्कृतीची मुळं अफघानिस्तान आणि इराण या देशात आहेत.– ऑक्सफर्ड आणि केंब्रिजमध्ये नाहीत. अमेरिकेत तर नाहीतच नाहीत. अफघानिस्तान आणि इराण ह्या देशामधील घडामोडीबद्दल म्हणूनच अतिशय जागरूक असणं फार महत्त्वाचं आहे. तेथील घडामोडीबद्दल अमेरिकन किंवा युरोपिन आणि युकेमधील इंग्रज (बी बी सी वगैरे) वृत्तवितरणसंस्था काय प्रचार करतात त्यावर केवळ आपली मत बांधण हे वैचारिक गुलामगिरीचं लक्षण आहे.

– खैबरनामाचा लेखाक अकरा दिवाळीनंतर तुम्हाला निश्चित वाचायला मिळेल. साआदी आणि हाफीज ह्या सूफी तत्त्ववेत्त्याच्या शहराची माहिती मी तुम्हाला देईनच त्याचबरोबर सर्फराझचा भाऊ इराज आणि त्याचे दोस्त, त्याचा 'सावाक' बद्दलचा राग – त्याची स्वतःच्या देशाबद्दलची कल्पना– स्वप्ने– हे सार सार – मला जेव्हढ माझ्या भेटीत जाणवल ते सादर करीन!

आपण दिवाळी साजरी करीत असताना इराण–इराकचा लढा संपला असणार – आणि त्याच वेळी आपल्या ग्रामीण भागातील बावन्न कोटी भारतीय स्वातंत्र्याचे बंड नव्हे तर युद्ध पुकारत असणार अशी आपण आशा करू या ! □


आवृत्ती संपत आली....

जनांचा
प्रवाहो
चालिला

लेखक :
विनय हर्डीकर

मूल्य :
वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तकं

तीळ आणि तांदूळ

# ग. दि. मां. च्या प्रसन्न शैलीतली सुरेख व्यक्तिचित्रं

मराठी साहित्यात व्यक्तिचित्रं हा प्रकार इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेनं बराचसा दुर्लक्षिला गेलेला आहे. ठळकपणाणं लक्षात राहावीत अशी फार थोडी व्यक्तिचित्रं रंगविली गेलेली दिसतात. वृत्तपत्रं-नियतकालिकं आदींमध्ये विविध व्यक्तींवर भरपूर लेखन प्रसिद्ध होत असतं. 'व्यक्तिचित्रात्मक लेखन भरपूर' होत असल्याचा भास त्यामुळं निर्माण होतो; पण प्रत्यक्षात स्तुतिपर असंच बरंचसं लेखन त्यात आढळतं आणि तेही तात्कालिक नि तात्पुरतं असतं. अशा लेखनामुळं 'एखाद्याचा स्तुतिपाठ गाणं म्हणजे व्यक्तिचित्र रेखाटणं' आणि व्यत्यासानं व्यक्तीचं 'स्तुतिपर लेखन म्हणजे व्यक्तिचित्र' असा गैरसमज विवायला लागतो. आधीच तुलनेनं थोड्या असलेल्या व्यक्तिचित्रसंग्रहात वास्तव व्यक्तिचित्रांचे संग्रह थोडे आहेत. त्यातले काही अशा गैरसमजकारक लेखनाला सन्माननीय अपवाद जरूर आहेत. विख्यात कविलेखक (कै.) ग. दि. माडगूळकर यांनी लिहिलेल्या वास्तव व्यक्तिचित्रांचा 'तीळ आणि तांदूळ' हा संग्रह ही अशा सन्माननीय अपवादात एक नवी मोलाची भर मानावी लागेल.

ग. दि. मां. चा स्नेहसंग्रह फार मोठा होता. विविध क्षेत्रात त्यांचे स्नेही विखुरलेले होते. 'तीळ आणि तांदूळ'मध्ये ही विविधता पाहायला मिळते; पण साहित्य, चित्रपट आणि राजकारण या तीन क्षेत्रातल्या व्यक्तींचा त्यात प्रामुख्यानं समावेश आहे. त्यात पु. भा. भावे, यशवंतराव चव्हाण, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यासारख्या प्रसिद्ध व्यक्तींबरोबरच पंडित पुराणिक किंवा मंगळकाकांसारख्या विशेष परिचित नसलेल्या व्यक्तीही आहेत. इतकंच नव्हे, तर खुद्द ग. दि. मां. नाही ज्यांचं नाव आठवलं नाही असे 'स्वामी आत्रानंद'ही या संग्रहात एक छान जागा पटकावून बसले आहेत. याशिवाय आई, बहीण अशांसारखी काही घरगुती लोकांची व्यक्तिचित्रंही ग. दि. मां. नी यात रेखाटली आहेत.

या वैविध्यात व्यक्तिरेखांप्रमाणेच लेखनशैलीचेही विविध रंग पाहायला मिळतात. त्या त्या व्यक्तिरेखेला आणि तिच्या एकूण भाववृत्तीला (मूडला) साजेसा ढंग अण्णांनी वापरला आहे. या ढंगांच्या छटा सूक्ष्म आहेत; पण कधी मुलाखतीसारखा (मराठी चित्रसृष्टीतील स्वयंभू पुराणपुरुष) कधी निवेदन-भाष्याचा (एक दीपोत्सवी संध्याकाळ) तर कधी कथेसारखा (मी सिंह पाहिला होता) ढंग त्यांनी सहजपणानं वापरला आहे. हसऱ्या, गहिऱ्या, रंगतदार, करुण अशा विविध छटा त्यांनी साकार केल्या आहेत आणि त्यातून अनेक व्यक्तिरेखा जिवंतपणे डोळ्यांसमोर साकार केली आहे.

सोळा व्यक्तींवरचे एकूण अठरा लेख 'तीळ आणि तांदूळ'मध्ये आहेत. (अण्णांचे जिवलग मित्र (कै.) पु. भा. भावे यांच्यावर आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री (कै.) वसंतराव नाईक यांच्यावर दोन-दोन लेख आहेत.) खुद्द स्वतःवरच अण्णांनी लिहिलेला 'हॅलो, मिस्टर डेथ' हा गाजलेला लेखही त्यात समाविष्ट केलेला आहे. मृत्यूनंतरच्या तिलांजलीची जाणीव देणारे तीळ आणि शुभप्रसंगाच्या निदर्शक असलेल्या अक्षता यांच्या सावल्यात ही व्यक्तिचित्रं वावरत आहेत म्हणूनच 'तीळ आणि तांदूळ' हे शीर्षक त्यांना एकत्रितपणे लाभलं आहे. अण्णांच्या कविप्रतिभेची आणि भारतीय संस्कृतीच्या त्यांच्यावरच्या प्रभावाची जाणीव करून देणारं हे आशयपूर्ण शीर्षक खरोखरच सार्थ आहे.

अण्णांची एकूण भाषाच आशयपूर्ण आणि कसदार आहे. या व्यक्तिचित्रांमध्ये त्यांच्या प्रासादिक, चित्रमय भाषेची अनेक लेणी जागोजागी विखुरलेली आहेत. अत्यंत प्रसन्न अशी ही भाषाशैली आहे तिच्यात एक विलक्षण झपाटलेला ओघ आहे. म्हणूनच वाचकाला ती आपल्याबरोबर गुंगवून पुढे नेत राहते. अगदी छोट्या छोट्या वाक्यांतून आणि प्रसंगांतून घटनांचा आणि भावविश्वाचा एकेक पट त्याच्यापुढे उलगडत राहते.

'अशा कचाटयाच्या कडयात आईचे मायाळू मनही विथरले. ती पोरांना मारू लागली. तिचे हात कठोर. त्यांचा आघात लोखंडाच्या पट्टीसारखा लागे. ती आम्हापैकी कुणाला तरी सडकून मार देई आणि मग स्वतःच रडत बसे!' (माझी आई), 'त्यांची (भाव्यांची) अक्षरे भुईनळ्यासारखी फुटून वर उडतात. उजेडाची झाडं उभी होतात. ती केवळ चकाकून विझत, निवत नाहीत. अवघ्या उंचीसह आणि विस्तारासह उभीच राहतात. ठिणग्यांचे झाड जणू नक्षत्रांचे होऊन जाते. आकाशगंगांचे पट्टे मनावर उकळत राहतात. ते पुसटत नाहीत की गोठत नाहीत.' किंवा 'भावे साहित्याचे मानधन घेतात. व्याख्यानांचे मूल्य घेतात. मागतकऱ्यांची मरगळ त्यांना कधी शिवली नाही.

आपल्या कामाचे पारिश्रमिक घेताना ते मुळीच बिचकत नाहीत. ते पुष्कळ मिळवतात, पुष्कळ खर्च करतात. त्यांच्या स्वभावाच्या इंद्रधनुष्यात विलासाचाही एक रंग आहे.' (सकलगुणैश्वर्यमंडित श्रीमान् भावेस्वामी गोसावी), 'अण्णा आस्तिक होते. तुळशीची माळ हा एक अलकार त्यांनी जन्मभर कठी मिरवला. भगव्या वेषाचे त्यांना फार आकर्षण होते भजने ऐकणे त्याना मनापासून आवडे जनसेवा हीच प्रभुसेवा अशा डोळस श्रद्धेने ते एक कृतकृत्य आयुष्य जगले धन, दौलत, अधिकार याचा लोभ त्याना मुळीच नव्हता... अशी देवासारखी माणसे क्वचित जन्माला येतात. देव माणसात जन्माला आला तरीही त्याला एके दिवशी मरावे लागते' (मी सिंह पाहिला होता.) – अशी अनेक उदाहरणं देता येतील. पानोपानी ती विखुरलेली आहेत. आवर्जून शोधावी लागतच नाहीत. किंबहुना अशी चित्रमयता आणि प्रासादिकता हीच ग दि. मा. च्या भाषेची स्वभावप्रकृती आहे.

या भाषेला आणखी एक आगळं वैशिष्ट आहे. 'मनुष्यजीवनातल्या काही निष्ठावर, आदर्शांवर आणि मंगल मूल्यावर माडगूळकराचा नितान्त विश्वास आहे,' असं संग्रहाचे संपादक – प्रकाशक आनंद अतरकर यानी 'पार्श्वनिवेदनात' म्हटलं आहे, त्याचा प्रत्यय देणार हे वैशिष्टय आहे. या श्रद्धा मानताना दुसऱ्याच्या श्रद्धाशी विरोध असला तरी त्याची कुचेष्टा त्यानी उडविलेली आही. दुसऱ्याचं एखाद वैगुण्य सागतानाही त्याचा अनादर त्यानी केलेला नाही स्वभावाच्या अशा छटा स्पष्ट करताना त्यानी संयमाचं भान ठेवल आहे. भाव्याची कडवी हिंदुत्वनिष्ठा, यशवंतराव चव्हाणाचं प्रासगिक मौन, स्वगृहातील काही मतभेद याबद्दलची' त्याची नापसती आपल्याला कळते; पण ओरखडा ओढल्यासारखी ती खरखरीतपणा धारण करीत नाही

(कै) स. गो. बर्वे यांच्या व्यक्तिचित्ररेखाटनात तर या सयमितपणाचं अत्यत प्रभावी दर्शन अनेकदा घडत. एखाद्याच्या भावविश्वातली अत्यत मोलाची गुप्त अशी पण आपल्याला माहीत असलेली एखादी गोष्ट खुलान खुलवून चवीचवीन सागण्याचा अनेकाना हव्यास असतो तो फारसा भूषणावह नसतो तरीही तसा मोह अनेकाना आवरत नाही. अर्थात अशा गोष्टीचा उल्लेख न करणं हे सपूर्ण व्यक्तिचित्रात सत्य लपविण्यासारख असतं. सत्याचा अपलाप न करता किती सयमानं आणि प्रभावीपणान मोजक्या शब्दात असा एखादा धागा गुफता येतो, हे 'स. गो बर्वे आमचे स्नेही' मध्ये ग. दि मा. नी सुरेख दाखवून दिल आहे. १९६२ च्या निवडणुकीत बर्वे निवडून आल्यावर त्याच्या घरी गेल्यावरच वर्णन करताना ग. दि मा. नी म्हटल आहे 'त्या यशवंत दिवशी बर्व्यांच्या बंगल्यात मला दिवाळी जाणवली; पण त्या दिवाळीचा मुखवटा होता भाऊबिजेसारखा प्रतिपदेच्या उत्सा हाचं दर्शन झालं नाही.' आणि पुढं बर्व्यांबरोबर सागलीच्या राणीसाहेबाकडे गेल्यावरचं वर्णन करताना एका वाक्यात ग. दि. मा नी प्रचड काही भरून ठेवल आहे, 'बर्व्यांच्या निवडणुकीच्या विजयदिनी पुण्यातील बंगल्यात जी प्रतिपदा चुकल्यारखी मला वाटली ती इथे गवसली!'

एक रसिक, सुसस्कृत, उच्च मूल्ये मानणारं मन असल्याशिवाय हा संयम येणं अवघड आहे. ग दि मा चं हे मन या प्रत्येक व्यक्तिचित्रात तरळत राहतं म्हणूनच 'प्रपच तपस्विनी कै माईसाहेब' याच्यासारखं एखादं व्यक्तिचित्र वगळता बहुतेक सर्वांना एक काव्यमयता आली आहे. विशेष म्हणजे या सर्वच व्यक्तिचित्राना कारुण्याची, हुरहुरीची झालर लाभली आहे. 'हॅलो, मिस्टर डेथ' सारखं डोळ्यासमोर तरळणाऱ्या मृत्यूचं शब्दचित्र हा तर या हुरहुरीचा एक विलक्षण आलेखच म्हणावा लागेल! 'बाधावरची गाय' हे स्वत च्या बहिणीचं–अक्काचं-अण्णांनी रेखाटलेल व्यक्तिचित्र करुण काव्यानं ओथंबलेलं आहे.

अशा 'या तीळ आणि तादूळ' मध्ये दोष नाहीत, असं नाही; पण पुस्तकाच्या गुणवत्तेच्या मानानं ते किरकोळ आहेत भावे आणि वसंतराव नाईक याच्यावरील दोन-दोन लेख काही अतरानं आहेत, त्याऐवजी दोन्ही लेख सलग घेतले असते, तर चागलं झालं असतं त्याबरोबरच मुद्रण अधिक निर्दोष आणि सुबक हवं होत आणखी एक त्रुटी मला जाणवली. ती म्हणजे ज्या नियतकालिकामध्ये ही व्यक्तिचित्र प्रथम प्रसिद्ध झाली त्याची नाव आणि प्रसद्धि-काल याचा उल्लेख केलेला नाही. तो आवश्यक होता. प्रसिद्ध-कालाच्या उल्लेखाअभावी काही वेळा लेखात येणारे 'दोन महिन्यापूर्वी' किंवा अशा स्वरूपाचे कालदर्शक उल्लेख कळत नाहीत (पुस्तकाची किंमतही जास्त वाटते.)

असे काही किरकोळ दोष असले तरी 'तीळ आणि तांदूळ' चं मोल त्यानं कमी होत नाही ग. दि. मा च्या प्रसन्न शैलीत साकार झालेल्या व्यक्तिचित्राचा हा एक सुरेख सग्रह आहे सुभाष अवचट यानी काढलेल मुखपृष्ठही परिणामकारक आहे. ग दि. मा.च्या निधनानतर प्रसिद्ध झालेलं त्याच हे पहिलच नवं पुस्तक आहे (पुनर्मुद्रण नव्हे.) मराठी साहित्याला त्यानी दिलेल्या लेण्यात त्यांच्या या 'तीळ आणि तादूळ' नं एक मोलाची भर घातली आहे.

**–विजय कुवळेकर**

**तीळ आणि तांदूळ** (व्यक्तिचित्रे)
ग. दि माडगूळकर
प्रकाशक–विश्वमोहिनी
६२।१२ कर्वे रोड, पुणे ४
पृष्ठे २००, किमत ३० रुपये

□


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# राशोमान

## रंगभूमीचे सामर्थ्य वाढविणारी कलाकृती

'राशोमान' हे एका दरवाजाचे नाव. या दरवाजाला जपानमध्ये तत्कालीन ऐतिहासिक संदर्भ आहे. आपण ज्याला चावडी म्हणू तसंच हे राशोमान. या दरवाजाजवळ बसून गावातल्या घडामोडींवर रोज चर्चा किंवा कुटाळक्या चालत. अशा या ठिकाणी घडलेल्या, अनुभवलेल्या गोष्टी म्हणजे राशोमान नाटक.

अकिरा कुरोसावा या जपानी चित्रपट-दिग्दर्शकाने याच नावाचा चित्रपट काढला. त्याला जगन्मान्यता मिळाली. ती एक वैश्विक कलाकृती म्हणून चित्रपटाच्या इतिहासात मानाने वावरते आहे. अशा कलाकृतीवर आधारित नाटक निर्माण करण्याचे धाडस 'अनिकेत' या मुंबईच्या नाट्यसंस्थेने केले आहे. त्यात ते यशस्वीही झाले आहेत.

चित्रपटमाध्यमात असलेल्या जबरदस्त ताकदीचे दर्शन त्या चित्रपटात घडते. नाटक या माध्यमाला असलेल्या मर्यादा आणि बंधनं लक्षात घेतली म्हणजे 'राशोमान'चा अनुभव हा चित्रपटाच्या अनुभवापेक्षा फार वेगळा नसल्याचे जाणवते. 'राशोमान'चा अनुभव चित्रपटकलाकृतीतून जाणवतो तेव्हा त्या अनुभवाचे नाट्यीकरण होऊ शकेल असे वाटतही नाही; तथापि त्या अनुभवाची सखोलता, तरलता आणि त्यामध्ये असलेल्या 'नाट्याचे दर्शन' हे नाटकही घडवताना दिसते.

मराठी रंगभूमीवर 'चित्रपटाकडून नाटकाकडे' असा प्रवास क्वचित झालेला दिसतो. हा प्रवास या नाटकामध्ये अधिक जाणीवपूर्वक केलेला दिसतो. रंगभूमीवरील हे प्रयोग रंगभूमीची प्रयोगशीलता आणि ताकद अधिक वाढवतात असे वाटते.

'राशोमान' हा एक वैचारिक पातळीवरचा अनुभव आहे. घटनांच्या साखळीमधून निर्माण होणारा हा अनुभव नाही, तर घटनेभोवती असलेले विचारांचे वलय अधिकाधिक गडद करून तो अनुभव सघन करण्याचा प्रयत्न या नाटकातून केलेला आहे. नाटकात घडणारी घटना अशी एकच. एक राजपुत्र (समुराय) आपल्या नवविवाहित पत्नीसह परगावी जंगलातून चाललेला आहे. जंगलचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ताजोमारूला ही स्त्री दिसते आणि तिला मिळविण्याचा तो पणच करतो. त्यासाठी त्या समुरायला सोन्याचांदीच्या मुठी असलेल्या तलवारींचे आमिष दाखवतो. समुराय या लोभापोटी ताजोमारू नेईल तिकडे जातो. ताजोमारू समुरायला जंगलातच पकडतो. समुरायच्या शोधात असलेली याची पत्नी शोधीत तेथे येते. तिच्या नवऱ्याला ताजोमारू जंगलातल्या एका झाडाला बांधून ठेवतो आणि त्याच्या समोर त्याच्या बायकोवर बलात्कार करतो. नंतर समुरायला झाडापासून अलग केल्यानंतर दोघांमध्ये तलवारीचे युद्ध होते, त्यात समुराय मृत्युमुखी पडतो.

घटना अशी एवढीच. वरील शब्दांकन खरी वस्तुस्थिती कशावरून? या घटनेत अंतर्भूत असलेल्या व्यक्ती-ताजोमारू, समुराय, त्याची पत्नी आणि हा प्रसंग पाहिलेला चौथा असा लाकूडतोड्या.

लाकूडतोड्या एका स्वामींबरोबर जंगलातून चालला असताना त्यांना समुरायचे प्रेत दिसते. त्याने स्वामी व्याकूळ होतात, जीवनाबद्दल निराश होतात. अशा अवस्थेत ते दोघेही राशोमानजवळ येतात. तिथं स्मशानातील प्रेतांचे केस चोरून त्यांचा व्यवसाय करणारा एक चोर. या तिघांचे जीवनविषयक दृष्टिकोन अगदी वेगवेगळे. स्वामीजी आधिभौतिक पातळीवरून जगणारे, तर लाकूडतोड्या दोन वेळच्या अन्नाच्या विवंचनेत. चोर व्यावहारिक दृष्टिकोनातून जगणारा. आपण ज्या जगात राहतो त्या जगाचा हिडिस चेहरा तुम्हा-आम्हाला दिसत नाही म्हणून आपण स्वतःपासूनच पळून जाण्याचा प्रयत्न करतो हे त्याचं तत्त्वज्ञान. एकाच घटनेचा अन्वय-अर्थ त्या घटनेतील प्रत्येकजण आणि हे तिघेजण इतक्या वेगवेगळ्या पद्धतीने लावताना दिसतात. त्या अन्वयार्थातून त्यांचे जीवनविषयक दृष्टिकोन लक्षात येतात, त्याचबरोबर प्रत्येकजण सत्य हे पूर्ण सत्य म्हणून स्वीकारत नाही तर त्याला गवसलेल्या गवाक्षातून त्याच्याकडे तो पाहातो आणि घटनेचे अन्वयार्थ लावतो, ही जगण्यातली फार मोठी फॉलिसी मांडली जाते. मानवी जीवनातील सत्याकडे पाहण्याचा हा भाग अनुभवाला अधिक जिवंत करतो, अंतर्मुख करतो.

ताजोमारू हा खुनी, दरवडेखोर म्हणून प्रसिद्ध. स्त्रीच्या लोभापोटी तो बलात्कार करतो आणि तिच्या पतीचा खून करतो ही घटना त्याच्यापुरती सत्यच! पण त्यातील स्त्री जेव्हा या घटनेबाबत साक्ष देते तेव्हा तिचे आणि नवऱ्याचे संबंध, तिचा पुरुषविषयक दृष्टिकोन आणि जगण्याची उत्कंठा याचे स्पष्टीकरण मिळते. तिचा नवरा तिच्या लेखी षंढ असतो, तिला ताजोमारू हा प्रथमच पूर्ण पुरुष भेटतो. या दृष्टीतून ह्या घटनेचा अर्थ एकदम वेगळा भासतो. आता समुरायच्या दृष्टिकोनातून ही घटना वेगळेपणाने जाणवते. समुरायला हा डोळ्यांसमोर झालेला बलात्कार सहन होत नाही. तो पत्नीची हेटाई करताना दिसतो, त्याचबरोबर त्याला स्वतःच्या असमर्थपणाविषयीची जाणीव होताना दिसते. या ठिणगीतून पेटलेल्या द्वंद्वात त्याचा मृत्यू होतो. आता ही घटना पाहिलेल्या लाकूडतोड्याला त्या समुरायच्या मृत्यूपेक्षा त्याच्या सोन्याच्या मुठीच्या तलवारीत जास्त रस. कारण त्याच्या पोरा-

बाळाच्या पोटाचा प्रश्न त्याला भेडसावणारा.

घटना तीच पण अर्थ मात्र वेगवेगळे. मानवी जीवनातील हे सत्य या नाटकाद्वारे उलगडून दाखविण्याचा प्रयत्न लेखक–दिग्दर्शकाने केलेला आहे अनुवादक श्री अनंत भावे याच्या अनुवादातील सहजता (काही अपवाद वगळता) प्रयोगाला अधिक उठाव देते. दिग्दर्शक म्हणून अमोल पालेकरानी या नाटकाविषयी बरेच परिश्रम घेतल्याचे जाणवते

प्रयोग म्हणून या नाटकाचे मूल्यमापन करायचे झाल्यास त्यातील सफाई, अभिनयातील सहजता व नेमकेपणा, तात्रिक बाजूचा नेटकेपणा याचा विचार करायला हवा. रंगमंचाचा सुरेख वापर या नाटकात जाणीवसूर्वक केलेला दिसतो जगलाचे नेपथ्य उभारताना त्या जगलाची सहजता (Depth) अधिक पूरक ठरते. नेपथ्यरचना हा या नाटकाचा एक विशेष मानावा लागेल

प्रकाशयोजनाकार बाळ मोघे यानी त्या अनुभवाला अधिक प्रकाशमान करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे फक्त खटकणारी गोष्ट एवढीच की, विजाचा कडकडाट आणि ढगाचा गडगडाट एकाच वेळी दाखविण्यात आले वास्तविक वीज चमकल्यानतर काही क्षणानी गडगडाट होतो असो त्यामुळे नाटकाच्या अभिव्यक्तीवर फार मोठा परिणाम झाल्यासारखे वाटत नाही.

मृत झालेला समुराय जेव्हा साक्ष देतो तेव्हा जपानमधील पारपारिक रूढीचा वापर केलेला आहे आपल्याकडे अंगात येणाऱ्या बाईच्या माध्यमातून ज्याप्रमाणे देव, मृतात्मा बोलतो हे दाखविताना ती स्त्री काहीच वेळ (सुरुवातीला) दिसते, त्यानतर पुन्हा काही काळाने समुरायचा मृत्यू होतो तेव्हा ती दिसते वास्तविक मृतात्मा बोलताना कोणाच्या तरी 'द्वारे' बोलतो आहे हे एकदा 'रजिस्टर' झाल्यानंतर पुन्हा ती स्त्री दाखविण्याचे काहीच प्रयोजन वाटले नाही तथापि जर हे टिच्युअल दाखवायचेच होते तर ते संपूर्ण काळ दाखविले असते तरी चालले असते !

अनुया पालेकर यानी समुरायच्या पत्नीची भूमिका केली आहे त्याचा अभिनय काहीसा बटबटीत झाल्यासारखा वाटतो त्याचे उच्चारही काही वेळा खटकतात, त्याचे चेहऱ्यावरील भावनाचे प्रदर्शन मात्र सुरेख ! दिलीप कुलकर्णीनीही 'ताजोमारू' समर्थपणे उभा केला आहे ते रंगभूमीवर नेहमी मुक्त असतात; पण या मुक्ततेतला सयमितपणाचा समतोलही त्यानी चागला साधला आहे.

समुराय, त्याची पत्नी आणि ताजोमारू याच्या अभिनयाला 'स्टायलाईज' केल्यामुळे त्या प्रयोगातील वास्तवता आणि भूतकाळ या दोन्ही पातळचा नेमकेपणाने अभिव्यक्त केल्या आहेत असे आटते

प्रयोगातील वेषभूषेबाबत काही शका उत्पन्न झाल्या समुरायची, ताजोमारूची वेषभूषा मूळ जपानी परपरेला धरून वाटली नाही चित्रपटात याच्या वेषभूषा जशा आहेत तशा त्या नाटकात का नाहीत ? असा प्रश्न यामुळे पडतो. अर्थातच नाटक व चित्रपट याची तुलना करण्याचा हेतू येथे नाही येथे नाटक ही स्वतत्र कलाकृती म्हणून पाहायला हवी.

या नाटकाचे जाणवलेले विशेष म्हणजे यासारख्या विषयाला नाट्यरूप देणे, ते करत असताना माध्यमाच्या मर्यादा लक्षात घेऊन या अनुभवातील नाट्यबीजे शोधणे व त्याचा समर्थपणे आविष्कार करणे अमोल पालेकर यानी याबाबत अधिक potentials दाखविली आहेत असे वाटते यासारख्या प्रयोगामुळे रगभूमीच्या अनुभवाचे विश्व अधिकाधिक व्यापक होत आहे

प्रायोगिक रंगभूमीवरील आविष्कारपद्धतीला एक साचेबद्धता प्राप्त झाली आहे असा आरोप हल्ली केला जातो; पण 'राशोमान'सारखे प्रयोग प्रायोगिक रगभूमी अधिक सशक्त करताहेत, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे अनुभव, आकृतिबंध आणि आविष्कार या तीनही पातळयावर या नाटकाने निश्चित लक्षणीय अशी कामगिरी केली आहे, यातच या नाटकाच्या सामर्थ्याची कल्पना येणे शक्य झाले.

—मुकुंद संगोराम

## कादंबरी आणि नाटक

[ सपादक माणूस,

गेल्या अंकात निखिल गजेन्द्रगडकर यानी 'बखर : एका राजाची' या नाटकाचे केलेले परीक्षण वाचले नाटक पाहून माझे मत मात्र वेगळे झाले ते कळवीत आहे.

—विनया खडपेकर ]

'इडियन नॅशनल थिएटर' निर्मित 'बखर . एका राजाची' या नाटकाचा पहिला प्रयोग रविवार दि २८ सप्टेंबर रोजी दुपारी चार वाजता रवींद्र नाट्यमदिर येथे झाला. 'बखर . एका राजाची' या आपल्या सुप्रसिद्ध कादंबरीचे श्री. त्र्य वि. देशमुख यानी स्वत च केलेले हे नाट्यरूपातर आहे. नाटकाचे दिग्दर्शक आहेत श्री. सदाशिव अमरापूरकर

हे नाटक म्हणजे रोमँटिक मनोवृत्तीच्या सवेदनाक्षम शास्त्याची शोकातिका, ब्रिटिश अमदानीतल्या साइखेड सस्थानचा राजा रघुवीरसिंह रघुवीरसिंह आंग्लविद्याविभूषित, उदारमतवादी, कनवाळू, कलाप्रेमी, रसिक आहे त्याची पत्नी त्याला आवडत नाही. त्याचे प्रेम राजसबाई या शिक्षिकेवर असते राणीला अर्थातच ते सहन होत नाही. रॉबर्टसनबरोबर चर्चा करण्यासाठी राजा मुबईला निघतो त्याच सुमारास राजसला गावातून हाकलण्याचा प्रयत्न राणीसाहेब करतात; पण राजाचे विश्वासू चिटणीस देसाई तिची मुबईला राजाच्याच हॉटेलमध्ये व्यवस्था करतात. तिच्यावर प्रेम असूनही राजा तिच्याशी विवाह करू धजत नाही. मुबईहून ती कोठे अज्ञात ठिकाणी निघून जाते पुढे राजाची पोटाची शस्त्रक्रिया होते. त्या शस्त्रक्रियेतच त्याला खलास करण्याचा ब्रिटिशाचा बेत, ब्रिटिश डॉक्टरच्याच प्रामाणिकपणामुळे फसतो. साइखेडात परतल्यावर कपटकारस्थान करणाऱ्या माणसाना राजा शिक्षा ठोठावतो. नतर स्वत च आत्महत्या करतो. असे हे थोडक्यात कथानक

आजकाल सर्व नाटकात साधारणपणे दिसणारे दोष या नाटकात नाहीत बहुतेक नाटके मुख्य विषयापासून फार इकडे जातात.

बाष्कळ विनोदात रेंगाळतात कोणते तरी भलतेच तपशील देत बसतात. प्रणयदृश्ये लावतात. स्त्रीदेहाचे उत्तान दर्शनही घडवतात. श्री वि सरदेशमुख याच्या या नाटकात हे दोष नाहीत 'लैंगिकते'चे भांडवल करण्याची सधी या नाटकात भरपूर होती, परंतु तिचा फायदा लेखक आणि दिग्दर्शकानी उठविला नाही ही गोष्ट मराठी रगभूमीची आजची परिस्थिती पाहता विशेष उल्लेखनीय ठरते. नाटकाचे सवाद ठीक आहेत. तरीही नाटक एकंदरीत कटाळवाणे होते याला कारणे अनेक आहेत

नाटकाचे कथानक ओघवते नाही घटनाचे, प्रसंगाचे तुकडे तुकडे आपल्याला दिसत राहतात राजा-राणी एक प्रसग– राजा-राजस दुसरा एक प्रसग राजा– रॉबर्टसन ही एक घटना. एका प्रसगातून स्वाभाविकपणे दुसरा प्रसग उगवत नाही, त्यामुळे नाटकाला गती येत नाही. नाटकातल्या व्यक्तिरेखाही स्पष्टपणे साकार होत नाहीत देसाई, बळी, सुलेमान ही सगळी सत्प्रवृत्त, प्रामाणिक, इमानी माणसे आहेत एवढेच आपल्याला कळते, परंतु प्रत्येकाचे वेगळे व्यक्तिमत्त्व डोळ्यासमोर उभे राहात नाही. राणीपेक्षा राजसमध्ये राजाला काय अधिक आवडते, राजसच्या व्यक्तिमत्त्वाच्या कोणत्या पैलूमुळे राजा तिच्याकडे खेचला जातो, राणीमध्ये काय जाचते आणि राजसमध्ये काय रुचते ते कळू शकत नाही नाटक पकड न घेण्याचे दुसरे कारण मुख्य रघुवीरसिंहाची भूमिका करणारे कलाकार श्री दिलीप कुलकर्णी याचा चेहरा, शरीरयष्टी त्या भूमिकेला अनुरूप नाही. कुलवत मराठा, आग्लविद्याविभूषित, सगीतप्रेमी, ग्रंथप्रेमी, कनवाळू, स्वप्नाळू, बुद्धिमान, स्त्रियाचा प्रियकर, ब्रिटिशांशी निर्भीड, वाणेदार बोलणारा, त्याच्यात निसकोच तडफदार वागणारा असा जो राजा नाटकातल्या संवादातून कळतो त्याचे रगभूमीवरचे दृश्यरूप अगदीच बुळे वाटते चालण्यात तडफ नाही. बोलण्याच्या पद्धतीत राजाला साजेसा खानदानी आब, रुबाब नाही. तमाशात एकच माणूस प्रथम पेंद्या होतो नतर मुकुट घालून राजा होतो, तसला हा राजा वाटतो. '*छिन्न*' *या नाटकात* श्री. दिलीप कुलकर्णी याचे अभिनयकौशल्य विशेष प्रत्ययाला येत होते, तसे येथे होत नाही राजाचे राजसशी प्रीतीचे उत्कट बोलणे आणि रॉबर्टसनशी मुत्सद्दीपणे बोलणे या दोन्ही संवादांची फेक एकाच सपाट पातळी वरून होते. राजाच्या चेहऱ्यावर मानसिक ताण दिसण्याऐवजी एकसारखा रटाळ कटाळा दिसतो. या भूमिकेसाठी साधारण विक्रम गोखले याच्यासारख्या व्यक्तिमत्त्वाचा नट पाहिजे होता असे वाटते नीना जोशी (राजस), अनंत वर्तक (देसाई) चंदू पारखी (मामासाहेब), सुधीर जोशी (केशवभट व डॉ. किल्पॅट्रिक), शशिकात पाटील (एडीसी व घोरपडे), प्रभाकर पारकर (महालिंगप्पा), विजय घमडे (सुलेमान), मदन बावधनकर (बल्ले), डॉ. शिरीष आठवले (दौलतराव), सुशील गोलतकर (वणीसाहेब रॉबर्टसन), सुरेश चिखले (रंगनाथ), विलास वालावलकर (खासनीस), दीपक शिर्के (बळी), नलिनी कानिटकर (दासी) या सर्वांनी आपापल्या भूमिका जेमतेम साभाळल्या आहेत. पाठ केलेली वाक्ये सरधोपटपणे उच्चारली आहेत. फक्त नयनतारा (राणी दमयंती) याचा अभिनय तेवढा सुजाण वाटतो.

नाटकातील वातावरणनिर्मितीही योग्य नव्हती. कोणी काही न बोलता केवळ समोर दिसणाऱ्या रगमचावरील सजावटीतून हा राजवाडा आहे की एखादे शाही हॉटेल आहे ते कळल पाहिजे, तसे ते येथे कळत नाही राजमहाल राजवाड्याची कचेरी, एखादे शाही हॉटेल हे या नाटकात नेपथ्याच्या साहाय्याने सहजपणे उभे राहू शकले नाही

अशा अनेक कारणामुळे नाटक कंटाळवाणे होते. कादबरीशी तुलना करता तर नाटक फारच फिके वाटते श्री. सरदेशमुख याची कादबरी वाचताना वाचक अगदी वाहून, बेभान होऊन जातो. धिप्पाड शाहूमहाराज, रॉबर्टसन, मिस क्लारा, राजस, शिर्क्यांची कोवळी पोर, बळी, सुलेमान अशा अनेक लहानमोठ्या व्यक्ती डोळ्यापुढे साकार होतात. ब्रिटिश रावजटीचा तो काळ माहिती नसूनही डोळ्यासमोर उभा राहतो. त्यात महाल दिसतो साइखेडची सरोवरे दिसतात संस्थानातला महारवाडा दिसतो. लहानसे स्टेशन दिसते विजेचे दिवे नमलेले मुबईचे बोरीबंदर स्टेशन दिसते. मुबईतली शाही हॉटेल्स दिसतात कादंबरीची ही भव्यता नाटकाला नाही. नाटक या माध्यमाला ही भव्यता पेलण्यासारखी नाही. कमालीची सूचकता आणि संवादसामर्थ्य ही भव्यता दाखविण्यासाठी नाटकात आवश्यक आहे कादबरीतील सूक्ष्म मनोविश्लेषण तर नाटकात पूर्णपणे लोप पावले आहे मागासाहेब, मिस क्लारा, ही माणसं नाटकात अचानक, अगातुकपणे उद्भवली आहेत असे वाटते. नाटकात राजस राजाच्या महालात असतानाच राणी दमयती अचानक आल्याचे दाखविले आहे. ते राजवाड्याच्या रिवाजाला धरून वाटत नाही. राजा किंवा राणी एकमेकाच्या महालात आधी वर्दी देऊन मगच जातात असे कादबरीत दाखविले आहे.

एका उत्कृष्ट कादबरीवर रचलेले हे एक सुमार नाटक आहे. ☐

## चित्रपट । सदानंद बोरसे

# बेरहम

### बे-रहम दिग्दर्शकाचा कथेवर अत्याचार

एक कर्तव्यदक्ष इन्स्पेक्टर चद्रमोहन शर्मा (शत्रुघ्न सिन्हा) आणि त्याचा आदर्श असलेला कमिशनर कुमार आनद (संजीवकुमार) याच्यामध्ये उभ्या ठाकलेल्या सघर्षाची कथा म्हणजे 'बेरहम' चित्रपट आणि एका बऱ्या कथेचा ढीगभर कचरा माल घालून कसा गळा घोटता येतो याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणज 'बेरहम' चित्रपट!

कुमार आनद हा पोलिसाच्या उजळ प्रतिमेला आत्यतिक जपणारा अधिकारी; पण त्याच्या पूर्वायुष्यातील प्रेयसीच्या – माया (माला सिन्हा) – मवाली नवऱ्याची त्याच्या हातून अजाणतेपणी हत्या होते. योगायोगाने त्या मृत्यूची चौकशी करण्याचे काम इन्स्पेक्टर चद्रमोहनकडे येते एकेक धागा पकडून त्याच्या आधाराने चद्रमोहन कुमारच्या जवळजवळ सरकत असतो. अखेरचा धागा आवळून तो कुमारच्या हातात बेड्या अडकवणार, तोच एका महत्त्वाच्या मोहिमेवर – एका शास्त्रज्ञाला पळवून नेण्याचा प्रयत्न हाणून पाडण्याच्या कामावर-दोघाना जावे लागते त्यातच कुमार मृत्युमुखी पडतो; पण मरताना तो आपण केलेल्या हत्येचा कबुलीजबाब चद्रमोहनच्या हातावर ठेवून जातो. कुमार आणि चंद्रमोहन याच्यातील हा वेधक संघर्षच जर फक्त चित्रपटात टिपला असता तर– ? पण नाही, दिग्दर्शक आर झालानी आणि कथालेखक के. डी शोरी

यांनी सगनमताने मनावर घेऊन यात एक कराटे निष्णात, जिम्नॅस्टिकपारगत आणि ज्यूडोविशारद स्त्रीपत्रकार किरण ( रीना रॉय ) घेऊन इन्स्पेक्टर चंद्रमोहनाची सोय (अर्थात गल्ल्याची सोय आणि चित्रपटाची गैरसोय) पाहिली, एका कवालीच्या निमित्ताने मौशमी चटर्जीला दाखवून घेतले, आणखी दोन–चार नाचगाणी टाकली, मग एक, दारूच्या अड्ड्यावरील हाणामारी, गॅरेजमधील हाणामारी, विमान व जीप यांची टक्कर, मोटारसायकलवरून मारामारी असे नानाविध स्टंट वापरून एक झक्कसा 'फॉर्म्युला हिंदी चित्रपट' बनवून टाकला. हे सगळे दाखवतानासुद्धा ते थोडेफार खऱ्याला जवळचे वाटेल, एवढीसुद्धा काळजी घेण्याचे कष्ट घेतलेले नाहीत. उदाहरणार्थ – भटनागर या शास्त्रज्ञाला पळवून नेण्याचा कट रचलेला असताना या शास्त्रज्ञाच्या संस्थेत प्रवेश करताना जी सुरक्षाव्यवस्था दाखवली आहे, ती पाहिल्यानंतर आपणच प्रेक्षकामधील पधरा–वीस जणाना घेऊन जावे आणि भटनागरसाहेबाना पळवून न्यावे, असा विचार आला होता किंवा मायावी आत्महत्या हाही असाच अडाणीपणाने दाखविलेला एक प्रकार. ती आपल्या केसाच्या पिनने मनगटातील रोहिणी तोडत नाही तर टोचते, जेमतेम पाच–सात थेंब रक्त निघाल्यावर मायाला ग्लानी येऊ लागते आणि जेमतम वाटीभर रक्त वाहून गेल्यावर ती मरून पडते. हा सगळा प्रकार खरा मानायचा म्हटले तर प्रत्येक रक्तदात्याचे पहिले रक्तदान हेच त्याच्या आयुष्यातील शेवटचे रक्तदान ठरले असते. साहाजिकच आपल्या मूळ धाग्याशी सबधित प्रकार म्हणजे संजीवकुमार, शत्रुघ्न सिन्हा याचा अभिनय आणि चित्रपटातील प्रसंग अतिशय प्रभावी ठरतात. चित्रपटातील आणखी एक भन्नाट भाग म्हणजे केश्तो मुकर्जीचा अफलातून दारुड्या; पण या सगळ्या प्रकारात पेरलेला बाकी तकलादू भाग म्हणजे आबेमोहर तादुळाच्या भातात प्रत्येक घासाला तीन–चार खडे लागावेत, तसा वाटतो.

चित्रपटातील गीत–संगीत प्रकार म्हणजे क्षणभगुर हा शब्दसुद्धा फिका पडेल इतक्या कमी मुदतीपर्यंत टिकणारा आहे.

थोडक्यात, चित्रपटाच्या शीर्षकाचा विचार केला तर छोट्यामोठ्याचा भेद न पाळता सगळ्यांना एका तराजूत तोलणारा कायदा निर्दय असेल किंवा नसेल, पण बरी कल्पना, वाईट कल्पना कशाचाही विचार न करता त्याच त्या भिकार मालमसाल्याचा वापर करून एकाहून एक वाईट चित्रपट सोशिक प्रेक्षकाच्या माथी मारणाऱ्या निर्माता–दिग्दर्शकासाठी 'बेरहम' शब्दही फिकाच ठरेल !

*

# नीयत

एक नेहमीची पंपम्गाडी नेहमी-नेहमीच्या मुंबईच्या रस्त्यावरून सिनेमाची टायटल्स सपेपर्यंत गरारा हिंडत असते. ती संपली आहेत, हे लक्षात आल्याबरोबर ती थांबते आणि त्यातून आपला नेहमीनेहमीनेहमीचा जितेंद्र ऊर्फ जीत निघतो मग भराभर त्याला शशीकपूर ऊर्फ विजय आणि इन्स्पेक्टर अजय ऊर्फ राकेश रोशन भेटतात. तर हे तिघे जानी दोस्त ! जीत भयकर श्रीमंत. अर्थातच त्याचे वडील सेठ मोहनलाल (पिंचू कपूर) 'आतून तमाशा, वरून कीर्तन' स्टाइलचे. आतून स्मगलर, वरून धर्मात्मा. (सदर्भ– प्रत्येक मोठ्या वैभवामागे एक मोठे पाप दडलेले असते.) विजयचा मोठा भाऊ ( डॉ. श्रीराम लागू ) एक अतिशय निर्भीड–आणि अऽ सत्यवचनी– आणि प्रामाणिक– आणि अंऽ पत्रकार असतो. (या ठिकाणीच चित्रपटाचे सगळे कथानक तुमच्या ध्यानात आले असेल. मैत्री, प्रेम वगैरे वगैरे घासून काढण्यासाठी स्मगलर विरुद्ध पत्रकार असा केवढा मोठा संघर्षाचा दगड मिळाला ! पण नाही, कथालेखक के. ए. नारायण आणि दिग्दर्शक अनिल गागुलीचे एवढ्यानेच समाधान झाले नाही. त्यानी हा सघर्ष आणखी तिखट करण्यासाठी रेखा (रेखा) नामक एक गरम मसाला त्यात ओतला. जीत, विजय आणि अजय हे तिघेही रेखाच्या सहवासात येतात, तिच्या प्रेमात पडतात आणि आपली शमा एकच आहे, हे अर्थातच या तिन्ही परवान्याना माहीत नसते. अखेर यात विजय बाजी मारतो, पण जीतचेही रेखावर प्रेम आहे, हे कळल्यानतर त्यागाची चढाओढ, गैरसमजाची गुतागुत आणि उकलण एवढे सगळे झाल्यावर विजय–रेखाचे शुभमंगल होऊन खऱ्या प्रेमाचा जयजयकार आणि जीतचा 'संगम' (म्हणजे एक 'धडाड' अशी गोळी आणि आऽऽऽ) होतो.

या ठिकाणी सुमारे दीड–दोनशे शब्दामध्ये चित्रपट संपला असला; तरी प्रत्यक्षात मात्र दिग्दर्शकसाहेबानी डोक्यात आलेल्या प्रत्येक गोष्टीचा वापर करायचाच, या जिद्दीने त्यात सर्व प्रकार घुमडले आहेत. सुरुवातीलाच काही रिकामी खिडारे, त्याच्या आसपास उठणारा पांढरा धूर आणि या सगळ्यात रात्री पाढरे कपडे घालून गाणे म्हणत हिंडणारी एक तरुणी भेटते नंतर मग एक drug-addict च्या भूमिकेत बिंदूबाई भेटली मध्येच एकदा बिंदूच्या नशेच्या गोळ्या घेऊन रेखाबाई झिंगतात आणि विजयच्या गळ्यात गळा घालून एक 'तुम्हे ऐसे कैसे दे दूं अपने घर का पता' असे गाणे म्हणून टाकतात नंतर मग प्राचीन मूर्तींचे स्मगलिंग आहे. पत्रकाराचा खून आहे. बिंदूच्या खुनाचा विजयवर आळ आहे हाणामाऱ्या आहेत आणखी काय काय हवे बरे ?

सरकारी नोकरीत ज्याप्रमाणे निवृत्तीसाठी वयोमर्यादा ठरविलेली आहे, तशी चित्रपटसृष्टीमध्ये ठरवायला हवी. अन्यथा सुरकुत्याचे जाळे पसरले, बोळक्यातील कवळी पडायला आली; तरीही पचविशीच्या नायकाच्या भूमिकेत वावरणारे शशीकपूर आणि जितेंद्र आम्हाला बघावे लागतील ! 'तुका म्हणे त्यातल्या त्यात' प्रमाणे चित्रपटात सभ्यतेचा बुरखा पाघरलेला उच्चभ्रू खलनायक रणजितने चागला उभा केला आहे. मुख्य म्हणजे नेहमीची 'हा : हाः हाः' गिरी तो करीत नाही आणि मारामाऱ्याही कमी करतो. या सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेची जरूर गीतकार आणि सगीतकरानाही आहे, याचा ढळढळीत पुरावा म्हणजे नीयत. (गीतकार–इंदिवर आणि गुलशन बावरा. संगीतकार–कल्याणजी आनंदजी.)

नीयतची जाहिरात पहा–

'ही कथा आहे निरपेक्ष प्रेमाची, उदात्त त्यागाची, निर्मळ मैत्रीची, त्याबरोबरच माणसात आढळणाऱ्या कपटाची, लोभाची आणि स्वार्थासाठी दुसऱ्याचा घात करणाऱ्या हीन प्रवृत्तीची !'

थोडक्यात हा चित्रपट म्हणजे सर्व गोष्टी एकत्र कालवून तयार केलेले रगडा रमायन आहे, अशी स्पष्ट कबुलीच या जाहिरातीतून दिली आहे. □

## पुणे वार्ता

पृष्ठ ३ वरून...

सुमारे चाळीस अक अमतील हेरकथा आणि बालसाहित्यावरील प्रत्येकी सुमारे पंधरा अंक असतील. दहाएक अंकांमध्ये विनोदी साहित्य वाचकांना वाचायला मिळे ल. राज कीय-सामाजिक विषयांना प्राधान्य देणारे पाच-सहाच अंक या जत्रेत सामील होतील; पण पूर्णपणे ज्योतिष आणि क्रीडेला वाहिलेलीही दोन-तीन तरी अक त्या त्या वाचकाचं समाधान करतील !

'दिवाळी अंकाच्या किंमतीबद्दल बोलताना श्री. खरे म्हणाले, 'दरवर्षी वाढणाऱ्या महागाईबरोबरच दिवाळी अकाची किंमतही दरवर्षी दीड ते दोन रुपयानी वाढत आहे. त्यामुळे सामान्य माणसाला कोणताही दर्जेदार अंक स्वतः विकत घेऊन वाचणं जवळजवळ परवडेनासं झालं आहे. कारण अशा दिवाळी अंकांची किंमत किमान सात ते आठ रुपये असते. शिवाय एखाद्याने स्वत विकत घ्यायचं ठरवलंच तरी तो एखाद-दुसऱ्या अंकापलीकडे जास्त अंक घेऊ शकत नाही. कारण दिवाळीनिमित्तच्या खास बजेटमध्येच त्याला हा खर्च बसवायचा असतो.

'यातूनच वाचनालयाच्या व्यवसायाला हल्ली जास्त तेजो आली आहे कारण कोणत्याही वाचनालयात दहा-पधरा रुपये भरले की, महिन्याभरात पंधरा-वीस तरी अक वाचकाला वाचायला मिळतात. त्यातही स्त्रियाच्या मासिकाना वाचनालयामधून जास्त मागणी असते. त्यामुळे अशा अंकाच्या प्रतीही वाचनालयाचे चालक जास्त घेतात. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी अशी परिस्थिती होती की, तीस-चाळीसच दिवाळी अंक निघायचे; पण त्यातील बरेचसे अक स्टॉलवर खपायचे. आता वाचनालयवाले हेच आमचे मुख्य ग्राहक झाले आहेत.

'दिवाळी अकामधल्या साहित्याचा दर्जा दरवर्षी घसरतच आहे, अशी तक्रार वाचक आणि दिवाळी अंकाचे संपादकही हल्ली वारंवार करतात; पण तरीही त्याचा खपावर फारसा परिणाम झालेला दिसत नाही. 'आवाज' सारखा अंक पुण्यातच जवळजवळ पंधरा हजारापर्यंत खपतो. तसंच महाराष्ट्रातल्या इतर ठिकाणाहून निघणाऱ्या दिवाळी अंकापेक्षा पुण्या-मुबईच्या अंकाना मागणी जास्त असते. बाहेरगावच्या सुमारे पंचवीस दिवाळी अंकापैकी दोन-तीनच अकाना विशेष मागणी असते. फक्त दिवाळीलाच प्रसिद्ध होणाऱ्या खास 'दिवाळी वार्षिक' अकाची संख्या सध्या सुमारे पचवीस ते तीस आहे; पण इतर अंकाच्या खपावर त्याचा विशेष परिणाम होत नाही. कारण प्रत्येक दिवाळी अंकाचा विशिष्ट वाचकवर्ग बांधलेला असतोच.

'अकाच्या दर्जाचा विचार केला तर असं लक्षात येतं की, दिवसेंदिवस तांत्रिक सफाईमुळे अंकाचा 'फॅशनेस' वाढत चालला आहे. कल्पनाशक्तीतून साकार झालेल्या कलात्मक कव्हरापेक्षा सुदर स्त्रिया किंवा नटयांच्या छापील चित्रांनीच हल्लीचे जवळजवळ नव्याण्णव टक्के अक ग्रासून टाकले आहेत ! नाटय-चित्रपट या विषयाची आणि त्यातही चित्रपटविषयक लेखाची रेलचेल असणाऱ्या अकाना हल्लीच्या बाजारात जास्त उठाव असतो. तसंच कुठल्याही विषयावरचे भडक लेखन जास्त उचललं जातं. त्याखालोखाल ज्या दिवळी अंकामध्ये भरपूर कथा असतील अशा अंकाना मागणी जास्त असते.

गेल्या काही वर्षांतलं दिवाळी अकाचं आणि वाचकाचं दिसणारं स्वरूप असं आहे. अर्थात पुढल्या दोन-पाच वर्षात तरी यात काही फार फरक पडेल असं मला वाटत नाही.'

दिवाळी अंक प्रकाशनाचे वाटेवर असताना श्री. खरे यांनी त्याच्या बाजारातल्या उलाढालीविषयी माडलेलं हे चित्र खरोखरच इंटरेस्टिंग आहे. काहीजण तर केवळ पैसे मिळवण्यासाठी दिवाळी अंक काढतात, असंही बोललं जातं. मराठी लेखकांच्या दृष्टीनेही हा काळ म्हणजे कुंभमेळाच असतो. बिचारा वाचक मात्र अगोड लाडूबरोबर किंवा कडक चकलीबरोबर मोठ्या आवडीनं हे दिवाळी अकही भरडतो आणि दिवाळी सर्वार्थाने साजरी केल्याचं समाधान मानतो !

—प्रतिनिधी

---

## होता कुरूप वेडा तो राजहंस एक

"तर लॉरेन्सच्या लेखी देवाची पूजा केवळ लांबून फूल-अक्षता फेकून का करायची असते ? स्वतःला पूर्णपणे झोकून देऊन, उत्कटपणे, स्वतःचा चेहरा पुसून आणि अस्तित्व संपवूनच ती करायची असते. मध्यमवर्गाशी आणि उच्चभ्रू वर्गाशी लॉरेन्सच भांडण अशासाठी की, हा भक्तिभाव त्यांना कधीच जमणार नाही. त्यांना फार तर जिव्हाळा आणि माया वाटेल. पण उसळतं, झोकून देणार प्रेम त्यांना कळणार नाही. आपल्या मर्यादित व्यक्तिमत्त्वांच्या दरिद्री सीमारेषा सांभाळत ते केवळ व्यक्तिविकासाची फुटकळ बडबड करीत राहतील. औद्योगिक प्रगती, यांत्रिकीकरणासारख्या कृत्रिम गोष्टींच्या मागे धावतील, आकाशाची सुदर निळाई काळचाकुट्ट धुरानं काळवंडून टाकतील. त्याची विशालता धुराड्याच्या रेघोट्यांनी छिन्नविच्छिन्न करून टाकतील......."

डी. एच्. लॉरेन्सच्या मृत्यूला यंदा पन्नास वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त या कामगारवर्गातून पुढे आलेल्या श्रेष्ठ साहित्यिकाची धगधगती जीवनकहाणी....

—माणूस दिवाळी अंक । लेखिका : ललिता बर्वे

बाहेरच्या जगातली ऐषारामी जिंदगी सोडून आम्ही परत का आलो होतो ?

आम्हाला आमच्या वतनसाठी, आमच्या अफगाणिस्तानसाठी खूप काही करायचं होतं...

आमचा देश इतका मागासलेला आहे, इतका दरिद्री आहे....तो आम्हाला मोठा करायचा होता....श्रीमंत करायचा होता.... पण हे काय होऊन बसलं !

आमचं सगळ्यांचं कुठं चुकलं ?'....

## –अन्वर सलीम

रशियन टँक्सने काबुल वेढले, अफगाणिस्तानचा गळा आवळला आणि असे हजारो अन्वर निर्वासित झाले....देशोधडीला लागले.
अशाच एका आपल्या देशातच निर्वासित होऊन राहिलेल्या एका उच्चविद्याविभूषिताची करुण कहाणी...
वास्तवात घडलेली....
कादंबरी स्वरूपात मांडलेली.
माणूस दिवाळी अंकात...
लेखिका : प्रतिभा रानडे (काबुल)

आणि

**भारतात असे काही घडू नये म्हणून**
**येथल्या भूमिपुत्रांना, बळीराजांना संघटित करून**
**लढ्याच्या पवित्र्यात उभे करणाऱ्या**
**शरद जोशी नामक उच्चविद्याविभूषिताची नवलकथा**

## योद्धा शेतकरी

सादरकर्ते
विजय परुळकर

## माणूस दिवाळी अंक : किंमत रुपये दहा

# एक साहसकथा
# पांडू खाडे

'पोरा, घोड्यावर बसतोस का!'
राजाराम महाराजांचा धारदार प्रश्न.
'जी सरकार!' म्हणून पोरानं तत्परतेनं उत्तर दिलं.
आयुष्यातल्या या पहिल्याच प्रयत्नात ते पोर त्या नाठाळ पोनीनं गाठोड्यासारखं जमिनीवर आदळलं.
'पोर हिमतबाज दिसतोय. जिद्दी आहे, चढू द्या त्याला परत!'
महाराज म्हणाले.
या खेपेला मात्र पोरानं पोनीवर चढून लगाम असे काही खेचले की पोनी भरधाव दौडू लागला.
ध्यानी-मनी नसलेल्या या छोट्याशा प्रसंगानं पोराच्या आयुष्यात क्रांती केली. जगातील सर्व सुप्रसिद्ध रेसमैदानांवर या पोराची, जगप्रसिद्ध 'जॉकी पांडू खाडे' याची अबलख घोडी दौडली, जिकली.
त्याच्याच शब्दात त्याचा हिंमतबाज, जिद्दी जीवनप्रवास
डॉ. श्रीकांत मुंदर्गी सादर करीत आहेत–

# माणूस दिवाळी अंक

**शिवाय**

कर्नल आनंद जाधव यांनी शब्दांकित केलेली
**'मृत्यूच्या जबड्यात पाच जनरल्स'**
ही कही-सुनी सत्यघटना
आणि
दि. बा. मोकाशी, वि. ग. कानिटकर,
विनय हर्डीकर यांचे ललित साहित्य.

+ +

# एक दीर्घकथा
# चक्रावून टाकणारी

साखर कारखाना, त्यातली माणसे, उलाढाल्या, कारवाया, भ्रष्टाचार, कारस्थाने जशीच्या तशी चित्रित करणारी....
सत्याधारित....
लेखक : रघुवीर मुळे

---

यापुढील २५ ऑक्टोबरचा साप्ताहिक माणूसचा अक प्रसिद्ध होणार नाही.
त्यापुढील आठवड्याचा अंक दिवाळी अक म्हणून प्रसिद्ध होईल.

---